

# मेहता मराठी ग्रंथजगत


सप्टेंबर, २०२४
पृष्ठे ६८ किंमत : रु. १५
वर्ष चोविसावे
अंक नववा



५ सप्टेंबर


## राष्ट्रीय शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !












## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**



### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

- १ जानेवारी, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२४ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.
- अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत
- पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो दिलेल्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२५ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ सप्टेंबर २०२४ ◆ वर्ष चोविसावे ◆ अंक नववा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
प्रतीक येतावडेकर

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

*— अनुक्रमणिका —*

| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **श्रद्धांजली** | **१०** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| सूत्रे नेतृत्व विकासाची | १२ |
| शेअरबाजार | १८ |
| द एलेफंट व्हिस्परर | २८ |
| हेड्स यू विन | ३८ |
| झिरो डे | ४६ |
| लोकशाहीच्या हत्येसाठी | ५४ |
| **अभिप्राय** | **५८** |
| **दिनविशेष** | **६२** |

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.



## संपादकीय

### महादेव मोरे : एक सिद्धहस्त लेखक

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात निपाणी हे टुमदार गाव आहे. जगाच्या नकाशावर हे गाव तंबाखूची मोठी बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे आचार्य अत्रे यांच्या 'तो मी नव्हेच' या प्रसिद्ध नाटकामधील पात्र लखोबा लोखंडे हासुद्धा 'तो निपाणीचा आहे' या स्वरूपाचे स्वगत नाटकात बोलतो. असे परिचित असलेले गाव म्हणजेच निपाणी. याच गावात 'महादेव मोरे' या सिद्धहस्त लेखकाचे अखेरपर्यंत वास्तव्य होते. मराठी साहित्यात दुसऱ्या पिढीतील जी मंडळी लेखक म्हणून स्थिरावली त्यांपैकीच महादेव मोरे हे एक अग्रगण्य लेखक.

महादेव मोरे यांचा जन्म निपाणी येथे झाला. प्रारंभीच्या प्राथमिक-माध्यमिक शालेय शिक्षणानंतर कोल्हापूर येथील गोपाळकृष्ण गोखले कॉलेज येथे महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास मोरे यांनी प्रवेश घेतला. त्याच वेळेस महादेव मोरे यांची पहिली कथा 'साप्ताहिक स्वराज्य' मध्ये प्रकाशित झाली. 'नवयुग', 'किर्लोस्कर', 'गावकरी' यांच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध कथा स्पर्धांत महादेव मोरे यांच्या कथांना पारितोषिके मिळाली. घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे मोरे यांना कॉलेज अर्धवट सोडावे लागले. कॉलेज सोडल्यानंतर त्यांनी अंगमेहनतीची

कामेही केली; परंतु त्याचबरोबर त्यांचे लेखनही चालूच होते.

महादेव मोरे यांनी काही काळ टॅक्सी ड्रायव्हर म्हणूनही काम केले; मात्र त्या कामात मन रमत नसल्याने त्यांनी नंतर निपाणी येथे गॅरेज काढले. त्या गॅरेजमध्ये त्यांनी विविध प्रकारच्या मोटारींच्या दुरुस्तीची कामे केली. त्या वेळेस येणारे लोक हेच पुढे त्यांच्या साहित्यातील कथा-कादंबऱ्यांची पात्रे बनली. महादेव मोरे यांचे साहित्य वाचत असताना त्यांनी उपेक्षित वर्गाच्या व्यथांना आपल्या लेखणीद्वारे वाचा फोडल्याचे पाहायला मिळते. महादेव मोरे यांच्या लेखनात वंचित, कष्टकरी, तंबाखू कामगार, देवदासी, वेश्या, कामगार यांच्याबद्दलचे विपुल लेखन वाचायला मिळते. महादेव मोरे यांच्या अनेक कथा-कादंबऱ्यांना पुरस्कारांनी गौरविले गेले आहे.

सीमावर्ती मराठीबहुल भागात राहून मराठीचा आग्रह धरणारा व मराठी बोलणारा सच्चा लेखक म्हणून महादेव मोरे यांची ओळख होती. रूढार्थाने कर्नाटकात राहूनही मराठीत दमदार आणि कसदार असे लेखन करणारा साहित्यिक म्हणून महादेव मोरे मराठी साहित्य विश्वात परिचित होते. लेखकाला मिळालेल्या मानसन्मानाने, पुरस्काराने तो मोठा होत नसतो. त्याचे साहित्य किती वाचले जाते यावर त्याचे मोठेपण ठरत असते. मानसन्मान मिळूनही आपला साधेपणा तसाच ठेवून जमिनीवर पाय असणारा साहित्यिक पाहायला मिळणे तसे दुरापास्तच; मात्र महादेव मोरे यांच्याकडे पाहिले की, जमिनीवर पाय असणारा आणि आपल्या साहित्यनिर्मितीत आनंद मानणारा साहित्यिक म्हणून एक दुर्मिळ असे चित्र डोळ्यांसमोर येत असे.

नंतरच्या काळात महादेव मोरे यांनी पिठाची गिरणी चालवली व त्यावर ते चरितार्थ भागवत. हे सर्व सुरू असतानाच त्यांच्या लिखाणात मात्र खंड पडलेला नव्हता. मराठीतील अरविंद गोखले या कथाकाराचा मोरे यांच्यावर प्रभाव होता. 'तुझी कथा माझे शब्द' या कथासंग्रहात एक वेगळेच अनुभवचित्रण मोरे वाचकांसमोर मांडतात.

महादेव मोरे यांच्या 'चिताक' व 'चेहऱ्यामागचे चेहरे' या कथासंग्रहांना

व ‘झोंबडं’ या कादंबरीला राज्य पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. ‘झोंबडं’ या कादंबरीला निपाणीच्या तंबाखू आंदोलनाची पार्श्वभूमी असून ती त्यांची वाचकप्रिय अशी कादंबरी आहे. त्याच धर्तीवरील अजून एक वेगळ्या प्रकारची कादंबरी म्हणजे ‘एकोणिसावी जात.’ मोटार लायनीत काम करणाऱ्या लोकांच्या व्यथा या कादंबरीत मोरे यांनी त्यांच्या खास शैलीत मांडल्या आहेत. न्या. नरेंद्र चपळगांवकर यांनी ही कादंबरी तब्बल बावीस वेळा वाचली आहे. तत्कालीन अनेक प्रसिद्ध कथा-कादंबरीकार महादेव मोरे यांच्या लिखाणाच्या प्रेमात होते. त्यांना महादेव मोरे यांचे लिखाण आवडत असे.

मेहता पब्लिशिंग हाऊस आणि महादेव मोरे यांचा ऋणानुबंध बऱ्याच वर्षांचा. अनिल मेहता व महादेव मोरे हे दोघे तर निपाणीत असल्यापासूनचे मित्रच. पुढे मेहता पब्लिशिंग हाऊन स्थापन झाल्यावर त्याचे रूपांतर प्रकाशक-लेखक नात्यात झाले. स्व. सुनील मेहता यांनीही ते स्नेहबंध दृढ केले. ‘समग्र महादेव मोरे’ हा मेहता पब्लिशिंग हाऊसच्या खास शैलीतील प्रकल्प सुरू आहे. सध्या त्यातील वीस पुस्तके प्रसिद्ध झाली असून, उर्वरित पुस्तकांचे काम मी आणि मेहता पब्लिशिंग हाऊसची टीम यांच्यामार्फत वाचकांसाठी उपलब्ध करण्याचा आमचा मानस आहे. या निमित्ताने मेहतांच्या तिसऱ्या पिढीचा ऋणानुबंधही महादेव मोरे यांच्या कुटुंबीयांशी जुळला गेलाय याचा अभिमान आम्हाला वाटतो.

नुकतेच महादेव मोरे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या जाण्याने मराठी साहित्य विश्वाचे तर नुकसान झालेच आहे; मात्र व्यक्तिगत मेहता पब्लिशिंग हाऊसचे न भरून येणारे नुकसान झाले आहे.

या सिद्धहस्त लेखकाला भावपूर्ण श्रद्धांजली!!

अखिल
मेहता


## नवी संहिता... नवा आशय...

# व्हिक्टरी सिटी

**सलमान रश्दी**

अनुवाद


**वंदना भागवत**




जादुई बियाणातून निर्माण झालेलं विजय-नगरचं साम्राज्य आणि त्याच्या निर्मातीचा विलक्षण जीवनप्रवास मांडणाऱ्या महाकाव्याचं सलमान रश्दींनी साकारलेलं अनोखं गद्यरूप

**किंमत : ५२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# परवेझ




**मेहेर पेस्तनजी**

अनुवाद

**सुनंदा महाजन**

मुंबईतील पारशी समाजरचना आणि संस्कृतीवर जातीय दंगलीचा झालेला परिणाम आणि व्यक्तिगत जाणिवांची घुसळण यांचा अनोखा मिलाफ साधणारी कादंबरी

**किंमत : ४५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

**Find us on: facebook®**

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक


**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

# श्रद्धांजली

**महादेव मोरे**

पुणे : मेहता पब्लिशिंग हाऊस परिवारातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ लेखक महादेव विठ्ठल मोरे यांचे दि. २१ ऑगस्ट रोजी निपाणीत निधन झाले. वयाच्या ८६व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली.

ग्रामीण कथा-कादंबरीकार म्हणून मराठी साहित्यात त्यांनी स्वत:चं वेगळं स्थान निर्माण केलं. त्यांना परिस्थितीमुळे कॉलेजचं शिक्षण अर्धवट सोडावं लागलं; पण माणसं वाचणं मात्र त्यांनी सोडलं नाही. त्यांच्या पिठाच्या गिरणीत येणाऱ्या माणसांचं भावविश्व त्यांनी कथा-कादंबऱ्यांतून, वैशिष्ट्यपूर्ण भाषेतून साकारलं. वारयोषितांच्या आयुष्यातील जीवघेण्या दु:खाची व्यथा पांढरपेशा समाजाला ऐकवली. भीषण वास्तवाला, दु:खाला तोंड देणारे त्यांचे नायक-नायिका मानवी जीवनाचा आरसा दाखवतात. वास्तववादी लेखनाबरोबरच विनोदी साहित्यही त्यांनी लिहिलं. मानवी स्वभावातील आणि सामाजिक, राजकीय जीवनातील विसंगती त्यांनी विनोदी लेखनातून टिपल्या.

त्यांचं स्वत:चं जीवन हलाखीत गेलं; पण अंतरातला साहित्याचा अंकुर त्यांनी कायम जपला. मित्रपरिवार, साहित्यिकांवर अपार प्रेम केलं. ग्रामीण मातीतला अस्सलपणा, निर्व्याज, निखळ प्रेम-माणुसकीचा झरा त्यांच्यात असल्याने तो साहित्यातही उतरला.



मेहता पब्लिशिंग हाऊसने आतापर्यंत त्यांची वीस पुस्तकं प्रकाशित केली आहेत. अनिल मेहता, कै. सुनील मेहता आणि अखिल मेहता या मेहता पब्लिशिंग हाऊसच्या तीनही पिढ्यांशी त्यांचा लेखन-ऋणानुबंध जुळला. 'चिताक' या त्यांच्या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार (१९७५), 'चेहऱ्यामागचे चेहरे'ला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार (२००२-२००३), 'झोंबडं'ला १९९०चा उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार प्राप्त झाला.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे महादेव मोरे यांना भावपूर्ण आदरांजली!

## डॉ. शंतनू अभ्यंकर



पुणे : डॉ. शंतनू शरद अभ्यंकर यांचं नुकतंच कर्करोगाने निधन झालं. ते ६० वर्षांचे होते. मेहता पब्लिशिंग हाऊसने त्यांचं 'राधिकासांत्वनम्' हे भाषांतरित पुस्तक प्रकाशित केलं आहे. यात त्यांनी तेलगू भाषेतील काव्याचा मराठी अनुवाद केला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे डॉ. शंतनू अभ्यंकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# सूत्रे नेतृत्व विकासाची

**एमा डी व्हिटा**

अनुवाद

**प्रमोद शेजवलकर**

*द लीडरशिप मास्टरक्लास : नेतृत्व आणि व्यवस्थापन कौशल्याची गुरुकिल्ली*

अभिनंदन! तुम्ही एका प्रशस्त, भव्यदिव्य कचेरीमधील एक महत्त्वाचे अधिकारी बनला आहात. तुमचा रुबाब आता काय विचारावा? किंवा कदाचित तुम्ही ‘बॉस’ आधीच झाला होतात; परंतु तुम्हालाच ते जरा भोंदूपणाचे किंवा घुसखोरी केल्यासारखे वाटत होते. होय; कारण तुम्हाला नोकरी मिळाली होती. तुम्हाला बढती पण मिळाली होती; पण तुम्ही आतून थोडेसे अस्वस्थ, बेचैन होतात. सरतेशेवटी एक नेता, एक ‘बॉस बनणे’ म्हणजे नेमके काय असते? त्यांची भूमिका

काय असते? आणि ती नेतेपणाची कामगिरी कशी पार पाडायची, हे आजवर तुम्हाला कोणीही का शिकवले नाही? का सांगितले नाही?

मंडळी, शांत व्हा! स्वस्थचित्त व्हा! हे 'असं' वाटणारे तुम्ही काही पहिली व्यक्ती नाही. प्रत्यक्षात तुम्हाला जर बॉस होऊन आठवडासुद्धा झाला नसेल, तोवर तुम्ही या जगावर राज्य गाजवायला आलेले एक राजे किंवा राणी आहात, असे वाटू लागले असेल, तर तुम्हाला बढती देऊन तुमच्या बॉसने घोडचूक केली आहे, असेच म्हणावे लागेल. स्वत:बद्दल फाजील आत्मविश्वास असणे, हा काही नेत्यामधील उत्तम गुण नव्हे. खरेतर तुम्ही सर्वोत्कृष्ट अधिकारी होणे, यासाठी कुठलाही एकमेव किंवा रामबाण उपाय अस्तित्वात आलेला नाही किंवा त्यासाठी कुठलीही हमखास मार्गदर्शिका नाही. बहुतेक सर्व प्रमुख अधिकारी किंवा व्यवस्थापकीय संचालक त्यांच्या यशाचा मार्ग, खाचखळग्यांतून, चुका करत आणि त्यातून धडे घेत आणि काही वेळा धोका पत्करूनच शोधत जातात. ते जर नशीबवान असतील, तर त्यांना चांगले गुणी मार्गदर्शक मिळालेले असतात. त्यांना भेटून ते जरुरीनुसार प्रश्न मार्गी लावतात. म्हणून उत्तम पाठिंबा, प्रोत्साहन मिळण्यासाठी तुम्ही अशा विश्वासू सल्लागारांना एकत्र करून त्यांच्याशी कायम संपर्क ठेवून एक उत्तम अशी यंत्रणा उभी केली पाहिजे, ही महत्त्वाची गोष्ट नेहमी लक्षात ठेवा. आणखी एक गोष्ट ध्यानात ठेवा की, उच्चस्थानी एकटेपणा जाणवण्याची खूपच शक्यता असते.

आता असं बघा की, तुम्ही इथवर पोहोचला आहात, म्हणजेच अधिकारी होण्यासाठी अंगात काय गुण असावे लागतात, हे बहुतांशी तुम्हाला माहीत झाले आहेच; परंतु आता त्या नेतृत्वगुणांचे नेमके काय स्वरूप आहे, तुम्हाला त्याचे नेमके महत्त्व काय अभिप्रेत आहे – यावर जरा अधिक खोलात जाऊन विचार केला पाहिजे. तुमच्यात वेगळे असणारे जे गुण तुमच्या नेतेपणाला आवश्यक आहेत आणि आधीच तुमच्यात वसत आहेत, ते बघणे क्रमप्राप्त आहे. तुमचे इतर लोकांनी अनुकरण करावे, असे कोणते गुण तुमच्यात आहेत, ते बघू या. तुमचा आत्मविश्वास, तुमचा ठामपणा, तुमची समस्या सोडवण्याची हातोटी, का तुमच्यातील बिनधास्तपणा, तुमच्याबद्दल कसा ठसा उमटलेला तुम्हाला आवडेल? एक जन्मजात नेता म्हणून, हुशार – अलौकिक बुद्धिमान व्यक्ती की काहीतरी आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व म्हणून?

का तुम्ही स्वत:तच एक स्वयंभू, स्वयंविचारी – बुद्धिवाद्याला बघत आहात?

**शब्दसंपत्ती :**

मवेरिक : हरफनमौला

*'मवेरिक' म्हणजे एक परंपरा मोडीत काढून स्वतंत्रपणे विचार करणारी, स्वत:च्याच विचारांवर विश्वास असणारी, धाडसी, उद्योगी, स्वयंभू व्यक्ती. 'टॉप गन'मधला टॉम क्रुझ, मायकेल ओ लिअरी, जॉन मॅजेक्सी, स्टेलिऑस हाई इयानो हे डोळ्यांपुढे आणा. या शब्दाला अमेरिकन संस्कृतीचा एक वेगळाच सुवास आहे. त्याचे कारण १९५०च्या टीव्ही सिरिअलमधील जेम्स गार्नरच्या ब्रेट मवेरिक या जुगारी, धाडसी व्यक्तिमत्त्वामुळे नव्हे, तर १८८० ग्लॅव्हस्टन (टेक्सासमधील) वर्तमानपत्रात राजकीय पुंडावा करणाऱ्या लोकांना उद्देशून प्रथम तसा उल्लेख केला म्हणून परंपरा न मानण्याऱ्या गतानुगतिकांपेक्षा वेगळ्या अशा व्यक्तीला 'मवेरिक' म्हणण्याची पद्धत पडली. हे खरेतर एक रूपक आहे. मवेरिक म्हणजे उंडारलेले वासरू. दावे सुटून माळावर हुंदडणारे वासरू. याचा असाही अर्थ काढता येईल. सॅम्युअल-ए-मवेरिक हा टेक्सासमधील एक धनाढ्य राजकारणी आणि जमीनदार होता. त्याने एका कर्जफेडीच्या बदल्यात चारशे गुरे मिळविली. त्याने ती गुरे (बकऱ्या, गायी, बैल इ.) दुसऱ्या एका कुटुंबाकडे सांभाळायला दिली; परंतु त्यांनी त्या गुरांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे ती गुरे, ज्यांच्यावर मवेरिकच्या नावाच्या खुणा केल्या नव्हत्या, ती पळून गेली आणि मोकाट सुटली. त्यांना पकडून आणण्यासाठी माणसे पाठवली गेली. त्या वेळी त्यांचे वर्णन 'मवेरिकची गुरे' असे करण्यात आले आणि नंतर 'मवेरिक' असेच त्यांना म्हणू लागले. जेणेकरून त्यावर इतर कुणी मालकी हक्क सांगू नये. (हे अगदी योगायोगाचे आहे की, जंगलीपणाने बोलण्याला मवेरिक म्हटले जाते.).*

**शब्दसंपत्ती :**

प्रतिभावान

*प्रतिभाशाली, अलौकिक बुद्धिमत्ता असलेली व्यक्ती एखाद्याला तू किती प्रतिभाशाली आहेस, असे म्हणण्याने किती आनंद वाटेल. जॅक वेल्श, रूपर्ट मर्डोक, बिल गेट्स आणि बिग ब्रदरचा निर्माता या लोकांची अशा बुद्धिमान लोकांत आधीच वर्णी लागलेली आहे. प्राचीन काळी ज्या व्यक्तीला सार्वकालीन ज्ञान असायचे त्याला 'जीनिअस' म्हणत. नंतर त्याच्या अर्थछटेत फरक पडत गेला. एकोणिसाव्या शतकानंतर ज्याला अलौकिक बुद्धी प्राप्त आहे आणि ज्याला काही अलौकिक शक्ती प्राप्त आहे, त्याला 'जीनिअस' म्हटले जाऊ लागले. अशा प्रकारची शक्ती ही उद्योगधंद्यात सहजगमनाची भासू लागली, अर्थात उपजत बुद्धीपेक्षा ही वेगळी समजली जाते. अगदी स्पष्टपणे म्हणायचे, तर ती ही जन्मजातच असते.*

तुम्ही स्वत:ला समजून घेणे, जाणून घेणे ही नेता बनण्यातील पहिली पायरी आहे; परंतु तुम्ही नेत्याप्रमाणे वागणेही तितकेच महत्त्वाचे आहे. लंडन बिझनेस स्कूलचे प्रो. रॉब गॉफी आणि सल्लागार गॅरेथ जोन्स त्यांच्या 'व्हाय शुड एनीवन बी लेड बाय यू?' या पुस्तकात प्रतिपादन करतात की, नेतेपणा हा एक नातेसंबंध आहे आणि हा नातेसंबंध सुरळीत ठेवणे, उत्स्फूर्तपणे संबंध दृढ करणे आणि तेही अगदी अचूकपणे आणि योग्य वेळी करणे, ही तारेवरची कसरतच आहे. ते पुढे असेही लिहितात की, चांगल्या नेत्यांना हे संबंध नेमके कुठपर्यंत न्यायचे हे चाणाक्षपणे कळते. दुसऱ्यांच्या भूमिकेत जाऊन ते अनुसरणे अत्यंत सौहार्दाचे, प्रामाणिकपणाचे आणि भावनाशीलतेने या संबंधाची बांधणी करणे आणि त्यापासून दूर होणे, लोकांना उद्दिष्टाप्रति चेतवणे, एखाद्याच्या कामचुकारपणाचा समाचार घेणे आणि सर्व संबंधांना पुलकित ठेवणे, या सर्व गोष्टी ते नेते अगदी सुयोग्यपणे हाताळत असतात. ते पुढे सुचवतात की, सर्व नेत्यांनी महत्त्वाचे प्रश्न स्वत:लाच विचारणे आवश्यक आहे.

१) तुमच्या नेतृत्वगुणाची कसोटी कुठल्या वैयक्तिक वेगळेपणामुळे सिद्ध होत आहे? तुमच्यातील कुठल्या वैशिष्ट्यांची इतरांना भुरळ पडत आहे? ते गुण तुमच्यात उपजत आहेत का? तुमच्यातील अशा गुणविशेषाविषयी नेमका विचार करा. तसेच तुम्ही ज्या लोकांना नेता म्हणून मार्गदर्शन करीत आहात, त्यांच्या संदर्भात तुमच्या वैयक्तिक मूल्यांचा आणि ध्येयांचा विचारविमर्श करा.

२) तुम्ही वेगवेगळ्या, मागच्या-पुढच्या संदर्भाचा मागोवा घेऊ शकता का? इतरांच्या वागण्यातील बारीकसारीक बदल तुमच्या लक्षात येतात का? तुम्ही तुमच्या वरिष्ठांशी, सहकाऱ्यांशी, हाताखालच्या लोकांशी सारख्याच हुशारीने वागू शकता का? तुमच्या स्पर्धकांबाबत तसेच ग्राहकांबाबत काय परिस्थिती आहे? जी मंडळी तुम्हाला आवडतात आणि जी नावडतात त्यांच्या बाबत वेगवेगळ्या संस्कृतींना तुम्ही कसे स्वीकारता? तुम्ही तुमच्या लहान समूहात किंवा मोठ्या जनसुमदायात, प्रत्येकाशी वैयक्तिक संबंध प्रस्थापित करू शकता का? त्यात तुम्ही पारंगत आहात का?

३) तुम्ही सर्वांशी नीट जुळवून घेऊ शकता का? केव्हा पडते घ्यायचे हे तुम्हाला समजते का? तुम्ही तुमचे स्वत्व, स्वत:ची ओळख न गमावता इतरांची मर्जी संपादन करू शकता का?

४) सामाजिक अंतर पाळण्याची प्रक्रिया तुम्ही योग्य रीतीने हाताळू शकता का? तुमच्या नेत्यांच्या मार्गदर्शकांच्या संपर्कात तुम्ही असता का? त्यांच्या किती जवळ असता? तुमच्या वैयक्तिक कामगिरीवर मोठ्या प्रमाणात प्रभाव असणाऱ्या व्यक्तींची ध्येये आणि प्रेरणांची माहिती, कल्पना तुम्हाला माहीत आहेत का? तुम्हाला अजून ज्याविषयी अधिक माहिती, ज्ञान हवं आहे, ते काय आहे याबाबत तुम्हाला कल्पना आहे का? तुम्ही योग्य वेळी इतरांपासून योग्य अंतर ठेवून अलिप्त होऊ शकता का?

‘व्हाय शुड एनीवन बी लेड बाय यू?’ आणि ‘व्हॉट इट टेक्स टुबी

ॲन ऑथेन्टिक लीडर’ या रॉब गॉफी आणि गॅरेथ जोन्स यांच्या परवानगीने याचे पुनर्मुद्रण केले आहे. हॉर्वर्ड बिझनेस प्रेस, २००६

तुम्ही नक्कीच असे काहीतरी योग्य आणि चांगले करत असणार ज्यायोगे तुम्ही इथवर पोचला आहात. तुमच्या मागून, तुमचे मार्गदर्शन घेण्यासाठी ज्याअर्थी हे लोक येत आहेत, त्याअर्थी त्यांना पटणारे आणि पटलेले असे काहीतरी तुमच्यात आहे, अशी त्यांची खात्री पटलेली असणार. हीच ती गोष्ट आहे, जी तुम्हाला इतरांपेक्षा वेगळ्या उंचीवर घेऊन जाणार आहे. आता तुम्हाला सुयोग्य वाटेल अशी खास नेतेपणाची सुखकारक, सुयोग्य पद्धत तयार करायची आहे. ज्यांना मार्गदर्शन करणार आहात, त्यांना ती पटली पाहिजे आणि तीच पद्धत तुम्हाला उत्तम फळ प्राप्त करून देणार आहे. त्याद्वारेच तुम्ही एक आदर्श आणि योग्य असे उदाहरण दाखवून देणार आहात.

‘इतरांवर प्रभाव पाडणारी एखादी कृती करणे, हे एखादे मार्गदर्शकतत्त्व नव्हे, तर तीच एकमेव गुरुकिल्ली आहे.’

**– अल्बर्ट आइनस्टाइन**

◆







**अतुल कहाते**

*विदेशी शेअर दलालांच्या रोचक कहाण्यांतून शेअर बाजाराचा घेतलेला सर्वांगीण वेध*

## शेअर बाजाराचा उगम

पुराणकाळातल्या रोममधल्या दंतकथेनुसार मर्क्युरियस ऊर्फ मर्क्युरी या नावाचा एक अत्यंत देखणा आणि बलवान देवपुरुष होता असं मानलं जाई. आजही उपलब्ध असलेल्या एका संगमरवरी पुतळ्यात मर्क्युरीच्या खांद्याभोवती एक थैली लटकवलेली दिसते. या थैलीचा वापर मर्क्युरियस आर्थिक व्यवहारांमध्ये करत असे, असं मानलं

जातं. या मर्क्युरियसच्या नावातूनच आता आपण सर्रास वापरत असलेले ‘मर्चंट’, ‘कॉमर्स’, ‘मार्केट’ असे व्यापार आणि आर्थिक व्यवहार यांच्याशी संबंधित असलेले शब्द जन्मले. रोमन साम्राज्याच्या सुरुवातीच्या काळात धान्याची तीव्र टंचाई भासे. अशा वेळी मर्क्युरियस आपल्या मदतीला धावतो, अशी रोमन लोकांची समजूत होती. त्यामुळे रोमन लोकांनी मर्क्युरियसचं एक देऊळ उभं केलं आणि तिथं धान्याच्या देवाणघेवाणीसाठीचे आपले व्यवहार सुरू केले.

खूप पूर्वीपासूनच माणसानं वेगवेगळ्या प्रकल्पांमध्ये आपले पैसे गुंतवून त्यातून नफेखोरी करण्यासाठी प्रयत्न केल्याचं आढळतं. उदाहरणार्थ, ख्रिस्तपूर्व ३१००च्या सुमाराला अस्तित्वात असलेल्या मेसोपोटेमियामध्ये ठरावीक प्रकल्पांच्या कामांमध्ये अर्थसाहाय्य करण्यासाठी काही लोक व्यापार करणाऱ्या कंपन्या काढायचे. उदाहरणार्थ, शेती करून धान्य पिकवणं, तसंच ते विकून नफा कमावणं, यांसारखी कामं या कंपन्या करायच्या. यातून नफेखोरी करण्यासाठीच्या वेगवेगळ्या क्लृप्त्याही लढवल्या जात. उदाहरणार्थ, सैनिक युद्ध केल्यावर दमून रात्री मजा म्हणून किती दारू पितील याचे अंदाज बांधून काही लोक आधीच दारूचा साठा करून ठेवत आणि ऐन वेळी त्यातली दारू चढ्या दरानं विकत.

‘पैसा’ या गोष्टीची माणसानं निर्मिती केल्यानंतर कित्येक शतकं पैसा कमवणं हे पाप असतं, असं मानलं जायचं! पुराणकाळामधल्या ग्रीसमध्ये कुठल्याही गोष्टीची रास्त किंवा योग्य किंमत किती असावी याविषयी ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकात ॲरिस्टॉटलनं भाष्य केलं होतं. ज्याप्रमाणे या विश्वामधल्या बऱ्याचशा घटना भौतिकशास्त्रामधल्या ठरावीक नियमांनुसार घडतात, त्याच धर्तीवर कोणत्याही दोन माणसांमधल्या आर्थिक व्यवहारासाठीसुद्धा ठरावीक नियम असले पाहिजेत, असं ॲरिस्टॉटलला वाटायचं. निसर्गाच्या व्यवहारामध्ये माणसानं किंवा बाजाराच्या व्यवस्थेनं लुडबूड करू नये, असा याचा अर्थ होता. कुठल्याही वस्तूच्या कमी-जास्त होणाऱ्या किमतींचा फायदा घेऊन त्यातून नफा कमवायचा प्रयत्न करणं म्हणजे तर अगदी नक्कीच मोठं पाप असतं, असं मानलं जाई. हीच संकल्पना इ.स. तेराव्या शतकात सेंट थॉमस ॲक्विनास यानं पुढे नेली. कुठलीही गोष्ट तिच्या खऱ्या किमतीपेक्षा स्वस्त दरानं विकणं किंवा विकत

घेणं हे पाप असतं, असं सेंट ॲक्विनासचं म्हणणं होतं. कुणालाही व्याज मिळवण्याच्या हेतूनं पैसे उधार देणं हेसुद्धा पाप मानलं जायचं. सेंट ॲक्विनासनं आपल्या आधीच्या काळामधल्या सेंट ऑगस्टाईनच्या म्हणण्याचाच यात आधार घेतला होता; कारण सेंट ऑगस्टाईन याच्या म्हणण्यानुसार सत्ता मिळवण्यासाठी प्रयत्न करणं, लैंगिक भावनांवर नियंत्रण न ठेवणं आणि पैशांचा मोह बाळगणं, या तीन गोष्टी म्हणजे मोठी पापं असायची.

ॲरिस्टॉटलला नफा कमावण्यासाठी उधार दिल्या जाणाऱ्या पैशांवर व्याज आकारलं जातं, याचीसुद्धा भयंकर चीड होती. कुठल्याही सजीवानं पुनरुत्पादन केल्यावर त्यातून मूळ सजीवासारखा नवा जीव जन्मतो हे ठीक आहे; पण उधार दिल्या जाणाऱ्या पैशांमधून नवा पैसा व्याजाच्या रूपानं जन्मतो हे मात्र ॲरिस्टॉटलला अगदी अनैसर्गिक वाटायचं. ग्रीक भाषेत तर व्याज या शब्दासाठी Tokoj म्हणून जो शब्द वापरतात त्याचा शब्दशः अर्थ 'अपत्य' असाच आहे! म्हणजेच पूर्वीपासूनच ग्रीक लोक व्याजाला पैशाचं अपत्य मानतात, हे ॲरिस्टॉटलला चांगलंच खटकायचं.

या संदर्भात ॲरिस्टॉटलनं मिलिटस इथल्या थेल्स या तत्त्वज्ञाच्या संकल्पनांविषयीही भाष्य केलं होतं. थेल्स हा तत्त्वज्ञ असल्यामुळे तो श्रीमंत असणं शक्यच नाही असं लोक म्हणायचे आणि त्यावरून थेल्सला खिजवायचे; पण लोकांच्या या बोलण्याचं थेल्सला काही वाटायचं नाही. त्यांच्या बोलण्यामधल्या चुका दाखवून द्यायचा थेल्सचा प्रयत्न सतत सुरू असे. थेल्सला भविष्य कळायचं असा समज होता. एकदा येत्या हंगामात ऑलिव्हचं नेहमीपेक्षा खूप जास्त पीक येणार असल्याचं थेल्सला यातून समजलं, अशी दंतकथा प्रसिद्ध आहे. थेल्सनं याचा फायदा उठवायचं ठरवून त्याच्याकडे असलेले मोजकेच पैसे काही शेतकऱ्यांना दिले आणि त्यांच्या शेतात ऑलिव्हचं पीक आलं, की त्यावर आपला पहिला हक्क असेल असा करार त्या बदल्यात करून घेतला. अजून पीक यायला नऊ महिने वेळ असल्यामुळे शेतकऱ्यांना नक्की काय घडेल याची कल्पना नव्हती. त्यामुळे आपल्याला खराब पीक लाभलं, तर निदान थेल्सनं दिलेले पैसे तरी कामी येतील या विचारानं शेतकऱ्यांनी या व्यवहाराला संमती दिली. अर्थातच तथाकथित 'दिव्यदृष्टी' लाभलेल्या थेल्सला नंतर आलेल्या प्रचंड पिकाचा खूप फायदा झाला. ऑलिव्हची विक्री थेल्स तोंडाला येईल त्या किमतीला करायला

लागला; पण त्या वेळी ऑलिव्हची खरेदी करणं सोडून दुसरा कुठलाच पर्याय इतर लोकांसमोर शिल्लक नव्हता! असं करण्यामध्ये थेल्सचा नफा कमावण्याचा हेतू नव्हता; पण आपण तत्त्वज्ञानी असूनही श्रीमंत आणि व्यवहारीसुद्धा आहोत, हे त्याला दाखवून द्यायचं होतं, असं ॲरिस्टॉटलनं लिहून ठेवलं आहे.

खरं म्हणजे थेल्सनं केलेला हा व्यवहार म्हणजे आता आर्थिक बाजारांमध्ये केल्या जाणाऱ्या 'ऑप्शन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यवहाराची सुरुवातच होती! शेअर बाजारामध्ये 'फॉरवर्ड' आणि 'ऑप्शन' अशा दोन प्रकारचे व्यवहार नेहमी केले जातात. या दोन व्यवहारांना एकत्रितरीत्या 'डेरिव्हेटिव्ह' असं म्हणतात. हा शब्द 'डिराईव्ह' या शब्दामधून आला आहे. 'डिराईव्ह'चा इथला अर्थ एका वस्तूची किंमत दुसऱ्या एखाद्या वस्तूच्या तुलनेत ठरवणं, असा होतो. या सगळ्याचा इथं काय संबंध? तर 'फॉरवर्ड'च्या व्यवहारामध्ये धान्य, भात, कॉफी, शेअर्स किंवा इतर कुठल्याही वस्तूच्या भविष्यातल्या व्यवहारासाठीची किंमत आत्ताच ठरावीक दरानं अदा केली जाते. म्हणून त्याला भविष्यातला किंवा 'फॉरवर्ड' प्रकारचा व्यवहार असं म्हणतात. अलीकडे 'फॉरवर्ड'पेक्षा 'फ्यूचर' असा शब्द जास्त वापरला जातो. तसंच ज्या गुंतवणूकदारानं सध्या भविष्यातला म्हणजेच 'फ्यूचर' प्रकारचा व्यवहार केला असेल त्याला हा व्यवहार ठरावीक पैशांच्या मोबदल्यात स्वतंत्रपणे दुसऱ्या गुंतवणूकदाराच्या हवाली करता येतो. मग थेल्सचा व्यवहार 'फ्यूचर' प्रकारचा का नव्हता, हे समजून घेणं गरजेचं आहे.

'फ्यूचर' व्यवहार आणि 'ऑप्शन' व्यवहार यांच्यातला फरक म्हणजे 'ऑप्शन'मध्ये गुंतवणूकदारानं जवळपास आपल्या गुंतवणुकीचा विमा काढल्यासारखीच परिस्थिती असते. म्हणजेच 'फ्यूचर'च्या व्यवहारामध्ये गुंतवणूकदारानं एकदा एखादी गोष्ट खरेदी करायची किंवा विकायची असं ठरवलं, की त्यासंबंधीचं बंधनच गुंतवणूकदारावर येतं. त्यातून गुंतवणूकदाराची सुटका होत नाही; पण 'ऑप्शन'च्या व्यवहारामध्ये मात्र हा व्यवहार रद्द करायची गुंतवणूकदाराला परवानगी असते. म्हणजेच समजा, गुंतवणूकदारानं भविष्यातल्या किमतींचा अंदाज बांधून त्याच्या संदर्भातले व्यवहार आत्ताच केले असतील आणि नंतरच्या काळात भविष्यातल्या किमतींचा आकडा आपल्या भविष्यातल्या व्यवहाराच्या दृष्टीनं अनुकूल नाही असं गुंतवणूकदाराच्या

लक्षात आलं, तर तो हा व्यवहार रद्द करू शकतो. म्हणजेच आपल्या उदाहरणात, भविष्यात ऑलिव्ह्ज खरेदी करण्यासाठी केलेला व्यवहार पूर्ण करायचं बंधन थेल्सवर नव्हतं. जर चुकून पीक खराब आलं असतं, तर थेल्सला हा व्यवहार मोडून टाकायची परवानगी होती. म्हणजेच अशा परिस्थितीत थेल्सचा 'ऑप्शन'चा व्यवहार संपला असता. 'ऑप्शन'ची संकल्पना एका सोप्या उदाहरणातून समजून घेणं शक्य आहे.

समजा एका कंपनीच्या एका शेअरची सध्याची किंमत १०० रुपये आहे आणि शेअर बाजार तेजीत असल्यामुळे एका वर्षानंतर ही किंमत २०० रुपयांवर जाईल असं मानलं जातं. याचा फायदा उठवण्यासाठी गुंतवणूकदारासमोर दोन पर्याय उपलब्ध आहेत :

(१) सध्याच्या १०० रुपये किमतीला एक शेअर विकत घ्यायचा आणि एका वर्षानंतर त्याची किंमत अंदाजानुसार २०० रुपयांवर गेली, की तो शेअर विकून १०० रुपयांचा नफा कमवायचा. अर्थात एका वर्षानंतर ही किंमत २०० रुपयांवर न जाता वेगळंच काही घडलं, तर गुंतवणूकदाराला अपेक्षित असलेला नफा मिळणार नाही आणि ही किंमत १०० रुपयांच्या खाली घसरली, तर त्याला कदाचित नुकसानसुद्धा सोसावं लागेल.

(२) सध्या शेअर विकत न घेता फक्त भविष्यात म्हणजे एका वर्षानंतर हा शेअर १०० रुपयांनाच विकत घ्यायचा फक्त 'ऑप्शन' आत्ता विकत घ्यायचा. यासाठी गुंतवणूकदाराला आत्ता 'बुकिंग अमाउन्ट' सारखा 'ऑप्शन प्रीमियम' भरावा लागतो. समजा या कंपनीच्या एका शेअरसाठीचा हा 'ऑप्शन प्रीमियम' २० रुपये असेल, तर गुंतवणूकदार आत्ता फक्त २० रुपये भरेल. आता एका वर्षानंतर :

१) समजा या शेअरची किंमत २०० रुपयांची पातळी गाठू शकली नाही, तर गुंतवणूकदार आपला 'ऑप्शन' रद्द करून टाकेल. म्हणजेच त्यानं भरलेला २० रुपयांचा 'ऑप्शन प्रीमियम' वाया जाईल आणि त्याचं २० रुपयांचं नुकसान होईल.

२) समजा या शेअरची किंमत अपेक्षेनुसार २०० रुपयांवर जाऊन पोचली, तर गुंतवणूकदार त्यानं विकत घेतलेल्या 'ऑप्शन'नुसार हा शेअर १०० रुपयांना विकत घेईल आणि लगेचच त्या वेळच्या २०० रुपये

किमतीला दुसऱ्या खरेदीदाराला विकून टाकेल. यात गुंतवणूकदारांना आलेला खर्च शेअरची किंमत १०० रुपये आणि 'ऑप्शन प्रीमियम' २० रुपये असा मिळून १२० रुपये इतका होईल. म्हणजेच गुंतवणूकदाराला २००-१२० म्हणजे ८० रुपये नफा होईल.

म्हणजेच अंदानुसार एका वर्षानंतर शेअरची किंमत खरंच २०० रुपयांवर गेली, तर आज शेअरची १०० रुपयांच्या भावानुसार खरेदी करणाऱ्या गुंतवणूकदाराला १०० रुपये नफा होईल आणि आज २० रुपयांचा 'ऑप्शन' विकत घेणाऱ्या गुंतवणूकदाराला ८० रुपये नफा होईल. असं असताना कुणी 'ऑप्शन' का विकत घेईल? सरळ १०० रुपये भरून शेअरच का विकत घेणार नाही?

यामागचं कारण म्हणजे २० रुपये भरून 'ऑप्शन' विकत घेणाऱ्या गुंतवणूकदाराकडे हा 'ऑप्शन' रद्द करण्याचा पर्याय असतो. म्हणजेच शेअरची किंमत अपेक्षेनुसार वाढली नाही, तर त्याचं नुकसान 'ऑप्शन प्रीमियम'पुरतंच मर्यादित राहील. याउलट गुंतवणूकदारानं १०० रुपये भरून शेअरच विकत घेतला आणि नंतर शेअरची किंमत अपेक्षेनुसार वाढली नाही, तर त्याच्यापुढे कमी नफा कमावून गप्प राहण्यावाचून किंवा नुकसान सोसण्यावाचून दुसरा पर्यायच शिल्लक राहत नाही.

आणखी एक महत्त्वाचं कारण म्हणजे आज पूर्ण किंमत भरून शेअर विकत घेणारा गुंतवणूकदार आणि याच्या विरुद्ध आज फक्त 'ऑप्शन' विकत घेणारा गुंतवणूकदार यांना मिळू शकणाऱ्या नफ्यामध्ये प्रचंड तफावत असू शकते. आपल्या उदाहरणात एका वर्षानंतर अपेक्षेनुसार खरंच या शेअरची किंमत २०० रुपयांवर गेली तर :

(१) आज १०० रुपये भरून शेअर विकत घेणाऱ्या गुंतवणूकदाराला एका वर्षानंतर हा शेअर २०० रुपयांना विकून २००-१०० म्हणजे १०० रुपये नफा होईल. म्हणजेच मूळ गुंतवणुकीइतकाच किंवा १०० टक्के नफा त्याला होईल.

(२) आज २० रुपये भरून 'ऑप्शन' विकत घेणाऱ्या गुंतवणूकदाराला एका वर्षानंतर २००-१००-२० म्हणजे ८० रुपये नफा होईल; पण तो मूळ गुंतवणूक २० रुपये असलेल्या गुंतवणुकीवर होईल. म्हणजेच

गुंतवणूकदाराला ४०० टक्के नफा होईल.

अर्थातच अशा प्रकारचे व्यवहार मोठ्या प्रमाणात व्हायला लागले, तर गुंतवणूकदारांना जाणूनबुजून एखाद्या गोष्टीची भविष्यात विक्री करायची असल्यामुळे त्या वस्तूच्या किमतीमध्ये ते कृत्रिमरीत्या फुगवटा निर्माण करायचा प्रयत्न करतील, हे उघड आहे. तसंच गुंतवणूकदारांना भविष्यात एखाद्या वस्तूची खरेदी करायची असेल, तर मुद्दाम त्या वस्तूच्या किमतीत घट होईल यासाठी गुंतवणूकदार प्रयत्न करायला लागतील. साहजिकच या प्रकारचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर व्हायला लागल्यापासून ठिकठिकाणच्या सरकारांना यामुळे अनेक वस्तूंच्या किमतीमध्ये विनाकारण चढ-उतार व्हायला लागतील, अशी भीती वाटायला लागली. त्यामुळे अशा चढ-उतारांना आळा घालण्यासाठी सरकारांनी अशा प्रकारच्या व्यवहारांवर नियंत्रण आणायचा किंवा त्यांच्यावर बंदी घालायचा प्रयत्न केला. नफा कमवण्यासंबंधीच्या संकल्पना इस्लामच्या आधिपत्याखाली असलेल्या देशांमध्येसुद्धा पाहायला मिळायच्या.

अर्थात एकूणच जर आपल्या फायद्यासाठी स्वस्तात एखादी गोष्ट विकत घेऊन ती शक्य तितक्या जास्त किमतीमध्ये विकायचा प्रयत्न केला नाही, तर त्यातून बाजारपेठ नावाची गोष्टच निर्माण होणं शक्य नाही. शेअर बाजाराच्या बाबतीतसुद्धा कित्येक शतकं हेच घडलं. एकीकडे अशा प्रकारे नफा कमवणं ही चांगली गोष्ट नाही असं म्हटलं जायचं; तर दुसरीकडे अशा प्रकारची बाजारपेठ नसली, तर कोणतेही व्यवहारच शक्य होणार नाहीत, असं लोकांच्या लक्षात यायचं. आजही कित्येकदा शेअर बाजाराविषयी बोलताना म्हणूनच काही लोक त्याच्या बाजूनं बोलतात, तर इतरांचा शेअर बाजाराच्या संकल्पनेला खूप विरोध असतो.

व्यापार करणाऱ्या किंवा गुंतवणूक करून नफा कमावण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांना ग्रीक साम्राज्यामध्ये फारसं महत्त्व दिलं जात नसे. एकूणच व्यवसाय करणं ग्रीक लोकांना प्रतिष्ठेचं वाटत नसे. व्यावसायिक मंडळी आणि चोर यांच्यात फारसा फरक नाही, असं लोक म्हणत. एखादा चोर ज्याप्रमाणे शेतकऱ्याकडून धान्य चोरतो, त्याच धर्तीवर शेतकऱ्याला लुबाडून व्यापारी स्वस्तात शेतकऱ्याकडून धान्य विकत घेतो आणि त्यानंतर चढ्या दरानं प्रचंड नफेखोरी करून हे धान्य तो सर्वसामान्य लोकांना

विकतो, असं यामागचं तर्कशास्त्र असे. प्रामाणिक माणूस एक तर शेतीच्या कामात राबतो किंवा लष्करात भरती होतो, असं समजलं जाई. साहजिकच व्यवसाय आणि व्यापार यांची ग्रीक काळात फार प्रगती होऊ शकली नाही.

ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात शेअरची संकल्पना रोममध्ये जन्मली. म्हणूनच शेअर्स विकण्यासाठीच्या पहिल्या बाजारपेठेचे उल्लेख रोमन साम्राज्यामधल्या ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकाच्या काळात सापडतात. अजून धर्माचं महत्त्व वाढलेलं नसल्यामुळेच हे शक्य झालं होतं. शेअर बाजाराचे व्यवहार नीटपणे चालण्यासाठीच्या तीन प्रमुख गोष्टी इथं बघायला मिळायच्या. या तीन गोष्टी म्हणजे गुंतवणूक करण्यासाठी गरज असलेल्या भांडवलाची उपलब्धता (कॅपिटल), उद्योग सुरू करू पाहणाऱ्या लोकांना कर्ज उपलब्ध होऊ शकणं (क्रेडिट) आणि काही लोकांनी आर्थिक व्यवहारांशी संबंधित असलेले धोके पत्करायची तयारी दाखवणं (रिस्क) या होत्या. यातून उद्योगाची वाढ झाली आणि त्यामुळे रोम हे आर्थिक व्यापाराचं केंद्र बनू शकलं. आपल्याकडे असलेला पैसा नुसताच साठवून ठेवण्यापेक्षा तो भांडवल म्हणून इतर उद्योगांमध्ये गुंतवायचा धोका पत्करायची तयारी दाखवणाऱ्या लोकांमुळे हा व्यापार वाढत गेला.

रोमन राज्यकर्त्यांनी देवळं बांधण्यापासून ते सरकारी कर गोळा करण्यापर्यंतची अनेक कामं 'पब्लिकानी' नावाच्या गुंतवणूकदारांच्या गटाला द्यायला सुरुवात केली. अलीकडे वेगवेगळ्या प्रकारची कामं करण्यासाठी जशा कंपन्या असतात तशीच 'पब्लिकानी'ची संकल्पना होती. 'पब्लिकानी' ही खासगी कंपनी असायची. सरकारच्या वतीनं कर गोळा करण्यासाठीचे हक्क आपल्याला मिळावेत यासाठी अशा अनेक कंपन्या स्पर्धेत उतरायच्या. त्यांच्यापैकी सरकारला पैसे देण्यासंबंधी सगळ्यात जास्त आकड्याची बोली लावेल त्या कंपनीला सरकार हे हक्क द्यायचं. अलीकडे कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या लोकांना त्या कंपन्यांचे शेअर्स मिळतात, त्याच धर्तीवर 'पब्लिकानी'चे सदस्य असलेल्या लोकांना 'पार्ट्स' (भाग) दिले जायचे. 'पार्ट' म्हणजे आजच्या भाषेतला 'शेअर'च होता. या 'पब्लिकानी' प्रकारच्या कंपन्या चालवण्यासाठी आजकाल असते तशी व्यवस्थापकांची एक टीमच असायची. तसंच या 'पब्लिकानी'चं कामकाज कसं सुरू आहे, तिच्या आर्थिक व्यवहारांची स्थिती कशी आहे, याविषयी तिच्यामध्ये गुंतवणूक


केलेल्या लोकांना माहिती देण्यासाठी सार्वजनिक बैठकाही घेतल्या जायच्या. अलीकडे जशा ‘शेअरहोल्डर्स मीटिंग्ज’ असतात, त्या धर्तीवर या बैठका होत असत. यातल्या काही ‘पब्लिकानी’ कंपन्यांचा आवाका तर प्रचंड मोठा असे. या कंपन्यांचा कारभार कित्येकदा अनेक वेगवेगळ्या प्रांतांमध्ये सुरू असे. अशा कंपन्यांमध्ये काही वेळा तर लाखो गुलामांना राबवून घेतलं जाई. या ‘पब्लिकानी’ कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणारे लोक दोन प्रकारचे असत. मोठ्या गुंतवणूकदारांकडे ‘पब्लिकानी’ कंपन्यांमधले खूप जास्त शेअर्स असायचे, तर छोट्या गुंतवणूकदारांकडे त्या तुलनेत खूपच कमी शेअर्स असायचे. या छोट्या गुंतवणूकदारांकडच्या शेअर्सचा प्रकारही वेगळा असे. त्या शेअर्सना ‘पार्टिक्यूल’ असं म्हटलं जाई. व्यवसाय करणाऱ्या लोकांना ‘इक्विट’ असं म्हटलं जाई. नंतर यातूनच भांडवलासाठी ‘इक्विटी’ हा शब्द निर्माण झाला. असं असूनही रोमन लोकांनाही ग्रीकांप्रमाणेच व्यावसायिक मंडळींविषयी राग वाटत असे.

◆


**नवी संहिता... नवा आशय...**

झिंगू लुखू लुखू

**बाबाराव मुसळे**




हुंड्याचा काळराक्षस वा लग्नासंबंधी इतर जाचक प्रथांवर प्रहार करत भारतीय समाजरचनेचं अस्वस्थ करणारं चित्रण मांडणाऱ्या कथा

**किंमत : २४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## नवी संहिता... नवा आशय...

# धग

**पेरुमाल मुरुगन**

अनुवाद

**दीपक कुळकर्णी**




शहरीकरणामुळे खालावलेल्या जीवनाची आणि ढासळलेल्या जीवनमूल्यांची अस्वस्थ करणारी मांडणी करणारी कादंबरी


**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# नदीमुख

**पेरुमाल मुरुगन**

अनुवाद

**डॉ. मानसी जयंत केळकर**





तंत्रज्ञानाबाबत जुन्या पिढीला असणारी अढी आणि नव्या पिढीच्या धारणांवर प्रकाशझोत टाकणारी कादंबरी...

**किंमत : ३६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**



## पुस्तकाच्या पानांतून




# द एलेफंट व्हिस्परर

**लॉरेन्स अँथनी**
**ग्रॅहम स्पेन्स**
अनुवाद
**मंदार गोडबोले**

*जंगली हत्तींच्या कळपाला माणसाळणाऱ्या एका रानवेड्याची अचंबित करणारी आत्मकथा*

दूरवर रायफलच्या गोळीचा आवाज ऐकू आला. तसे वाटले, जणू झाडाची फांदीच कोसळली असावी.

मी खुर्चीवरून उडी मारून उठलो. हा आवाज जंगलात काम करणाऱ्या प्रत्येक रेंजरच्या मनात ठसलेला असतो. मग पाठोपाठ अजून गोळीबार ऐकू आला–क्रॅक-क्रॅक-क्रॅक. पाठोपाठ पक्ष्यांचे थवे कर्कश आवाज करत हवेत उडाले, आणि सूर्यास्ताच्या किरमिजी

आकाशात उडून गेले.

शिकारी. पश्चिमेकडच्या सरहद्दीवर.

माझा रेंजर डेव्हिड आमच्या जुन्या भरवशाच्या 'लँडरोव्हर' गाडीकडे धाव घेत होता. मी एक बंदूक उचलली आणि त्याच्या पाठोपाठ धावलो. गाडीपाशी पोहोचल्यावर मी ड्रायव्हर सीटवर उडी घेतली. तपकिरी रंगाचा मॅक्स–माझा स्टॅफोर्डशायर जातीचा शिकारी कुत्रा–आमच्या दोघांच्या सीटच्या मधोमध जागा शोधून बसला. ही सगळी धावपळ चालू असताना तो काही मागे राहणार नव्हता.

मी इग्निशनमध्ये किल्ली फिरवून ॲक्सलरेटर दाबला, तसा डेव्हिडने गाडीतला रेडिओ हातात उचलला.

''डोंगा!'' तो ओरडला, ''डोंगा, तुला ऐकू येत आहे का? ओव्हर!''

माझ्याकडे स्थानिक 'ओव्हाम्बो' जातीचे शिपाई कामाला होते आणि डोंगा त्यांचा प्रमुख होता. त्याने पूर्वी सैन्यात काम केले होते. त्यामुळे त्याच्यासारखा माजी सैनिक एखाद्या लढाईत तुमच्या बाजूने असणे, ही जमेची गोष्ट होती. तो आणि त्याचे शिपाईदेखील त्याच दिशेला निघालेले आहेत, असे जर आम्हाला समजले असते तर बरे झाले असते; पण डेव्हिडच्या ओरडण्याला काही प्रत्युत्तर आले नाही. म्हणून मग आम्ही एकटेच निघालो.

'थुला थुला' अभयारण्य आम्ही विकत घेतल्यापासून, आम्हाला शिकारीच्या समस्येने फारच त्रास दिला होता. 'झुलूलँड'च्या मध्य भागात असलेले 'थुला थुला' हे एक अप्रतिम जंगल होते. गेले वर्षभर शिकारी आम्हाला त्रास देत होते. ते कोण आहेत, कोठून येत आहेत त्याचा आम्हाला पत्ता लागला नव्हता. आजूबाजूच्या इझीडुनांबरोबर (स्थानिक जमातींचे प्रमुख) मी कित्येक वेळेला ह्या विषयावर चर्चा केली होती. त्यांच्या जमातीतले लोक ह्यात सामील नाहीत, ह्या मुद्द्यावर ते ठाम होते. माझा त्यांच्या शब्दावर विश्वास होता. आमच्या इथे काम करणारे लोक मुख्यत्वे स्थानिक होते आणि अतिशय विश्वासू होते. हे चोर नक्कीच दुसरीकडून येत असावेत.

संधिप्रकाश खूपच मंदावत चालला होता. आम्ही पश्चिमेकडच्या कुंपणापाशी पोहोचल्यावर गाडी हळू केली. मग मी गाडीचे हेडलाइट बंद केले. बाभळीच्या झाडीच्या मधोमध, एका वारुळाच्या मागे आम्ही गाडी थांबवली. आधी

डेव्हिड गाडीतून बाहेर पडला. आमची उत्कंठा शिगेला पोहोचली होती. हातातल्या बंदुकीच्या चापावर बोटं ताणलेली होती. आम्ही इकडेतिकडे चाहूल घेत होतो. शिकाऱ्यांचा सामना करताना आम्ही छोट्या बंदुका वापरायचो. त्यात जड गोळ्या ठासून भरायचो, कारण अंधारात जंगलात कोणत्याही परिस्थितीचा सामना करावा लागतो. आफ्रिकेतला कोणताही रेंजर तुम्हाला सांगेल, की धंदेवाईक शिकारी पहिल्यांदा गोळी हाणतात आणि मग वळून कोणाला गोळी लागली ते बघतात.

आमच्या जागेपासून कुंपण पन्नास यार्डांवर होते. शिकाऱ्यांना नेहमीच परतीचा एखादा मार्ग हेरून ठेवावा लागतो. मी माझे हात गोल फिरवून डेव्हिडला खूण केली. त्याने मान डोलावली. मला काय म्हणायचे होते, ते त्याला पक्के कळले होते. मी सरपटत कुंपणाकडे जाऊन शिकाऱ्यांचा परतीचा मार्ग बंद करणार होतो आणि मी तिकडे जात असताना तो माझ्यावर लक्ष ठेवणार होता. जर शिकाऱ्यांशी हातघाईची लढाई झालीच तर हा उपाय आम्ही योजला होता. अश्रूधुराचा तीव्र वास आसपासच्या शांत वातावरणात सगळ्या आसमंतात भरून राहिला होता. आफ्रिकेत जंगल कधीच शांत नसते, रातकिड्यांचा आवाज तर कधीच बंद होत नाही. ह्याला अपवाद एकदाच असतो. बंदुकीच्या गोळीचा आवाज झाला, की सगळे आवाज काही क्षण शांत होतात.

काही मिनिटे संपूर्ण शांततेत गेली, माझ्या लक्षात आले की आम्हाला फसवले गेले आहे. मी माझ्या हातातला हॅलोजनचा टॉर्च चालू केला आणि कुंपणावर प्रकाशझोत फेकला. शिकाऱ्यांनी कुंपण कापून बाहेर जायचा मार्ग तयार केला आहे, असे कोणतेही चिन्ह दिसले नाही. डेव्हिडनेही त्याचा टॉर्च चालू केला. त्याने जमिनीवर पाऊलखुणांचा आणि रक्ताच्या डागांचा शोध चालू केला. जर कोणत्या प्राण्याला मारून ओढून नेले असेल तर जमिनीवर रक्ताचे डाग दिसले असते.

काहीच नव्हते. सगळीकडे फक्त गूढ शांतता पसरलेली होती.

कुंपणाच्या आत कोणत्याच खाणाखुणा नसल्यामुळे, गोळीबार कुंपणाच्या बाहेरून केला गेला असला पाहिजे, हे माझ्या लक्षात आले.

''हात रे! आपल्याला नुसते आमिष दाखवून इकडे आणले.''

हे मी बोलत असताना आम्हाला अजून गोळीबाराचा आवाज ऐकू

आला – आवाज जरी अस्पष्ट असला आणि खूपच लांबून येत असला, तरी तो आमच्या अभयारण्याच्या दुसऱ्या बाजूकडून येत आहे, हे आम्ही ओळखले. आतल्या कच्च्या रस्त्यांनी तिकडे पोहोचायला आम्हाला पंचेचाळीस मिनिटे तरी लागली असती. नुकताच वसंत ऋतूचा पाऊस झाला असल्यामुळे वाटेत बऱ्याच ठिकाणी चिखल होता, ते वेगळेच!

आम्ही लँडरोव्हरमध्ये उडी घेतली, आणि वेगाने आवाजाच्या दिशेने जाऊ लागलो. पण मला माहीत होते की, तिकडे जाणे व्यर्थ आहे. आम्हाला व्यवस्थित फसवले गेले होते. आम्ही चोरांना नक्कीच पकडू शकणार नव्हतो. आम्ही तिकडे पोहोचायच्या आधीच एक-दोन 'न्याला हरणां'ना घेऊन त्यांनी तिथून पळ काढलेला असणार होता. 'न्याला हरीण' हे आफ्रिकेतल्या सर्वांत सुंदर हरणांपैकी एक आहे.

मी माझ्या मूर्खपणाला शिव्या घातल्या. आम्ही आंधळेपणाने इकडे धाव घेण्याऐवजी, एक दोन रेंजर तिकडे पाठवायला पाहिजे होते, म्हणजे चोरांना रंगेहात पकडता आले असते.

पण ह्या सगळ्या प्रकरणामुळे एक गोष्ट सिद्ध झाली होती. *'इझीडुना'* म्हणत होते की, माझी समस्या अंतर्गत आहे–म्हणजे चोरांना आतून कोणीतरी मदत करते आहे–ते खरे होते. हे काही स्थानिक जमातींचे काम नव्हते. ही शिकार काही उपाशी आदिवासींनी आपल्या हडकुळ्या कुत्र्यांना बरोबर घेऊन केलेली नव्हती. आमच्या प्रत्येक हालचालींवर नजर ठेवून कोणीतरी अतिशय पद्धतशीरपणे केलेली ही शिकार होती. त्याशिवाय त्यांनी हे इतके सगळे नियोजनबद्ध पद्धतीने कसे घडवून आणले असते?

आम्ही पूर्वेकडच्या कुंपणापाशी पोहोचलो तेव्हा अंधार गुडूप झाला होता. आम्ही हातांतल्या टॉर्चच्या मदतीने तिथल्या गोष्टींचा अंदाज घेतला. वेगवान रायफलच्या मदतीने दोन 'न्याला हरणां'चा बळी घेतला गेला होता. जिथून त्या हरणांना फरपटत नेले, तिथले गवत सपाट झालेले, रक्ताने माखलेले दिसत होते. त्या हरणांना कुंपणापर्यंत ओढत नेऊन, कुंपणाखाली खड्डा करून बाहेर नेले होते. तिथले कुंपण अतिशय बेढब पद्धतीने, कटरच्या मदतीने कापले होते. कुंपणाबाहेर दहा यार्डांवर, जीपसारख्या फोर बाय फोर गाडीच्या चाकाला लागलेल्या चिखलाच्या खुणा दिसत होत्या. आत्तापर्यंत चोर कित्येक मैल लांब पोहोचले असणार. ते प्राणी एखाद्या

स्थानिक खाटकाला विकले जाणार होते. ते खाटिक त्या मांसापासून बहुधा ‘बिल्टाँग’ बनवतील. ‘बिल्टाँग’ हा प्रकार आफ्रिकेत फार प्रसिद्ध आहे. ‘बिल्टाँग’ म्हणजे जनावरांच्या मांसापासून वाळवून बनवलेल्या पट्ट्या.

माझ्या टॉर्चच्या प्रकाशात मला दिसले, की कुंपणापाशी रक्ताळलेली, तपकिरी–राखाडी रंगाची, मृत प्राण्याची फर पडलेली आहे. म्हणजे मेलेल्या जनावरांपैकी एक तरी नर असणार. मादी ‘न्याला हरीण’ बदामी रंगाचे असते आणि त्याच्या पाठीवर पांढरे पट्टे असतात.

मला थकल्यासारखे वाटू लागले होते. पूर्वी ‘थुला थुला’ ही जनावरांच्या शिकारीसाठी बनवलेली रांच होती. मी ती विकत घेतल्यावर शिकार थांबवण्याचा निश्चय केला होता. माझ्या नजरेसमोर कोणत्याही प्राण्याचा मी अकारण बळी जाऊ देणार नव्हतो. निश्चय करणे सोपे असते. तेव्हा माझ्या हे लक्षात आले नाही, की हा निश्चय टिकवणे किती अवघड होते.

निराशपणे आम्ही लॉजकडे परत आलो. फ्रान्सुआजने कडक कॉफीचा मग हातात देऊन आमचे स्वागत केले. इतके थकल्यावर मला ती कॉफी अमृतासमान वाटत होती.

मी तिच्याकडे पाहिले आणि स्मितहास्याने तिचे आभार मानले. फ्रान्सुआज उंच आणि अतिशय आकर्षक अशी फ्रेंच स्त्री होती. मी पहिल्यांदा तिला बारा वर्षांपूर्वी, कडाक्याच्या थंडीत, एका सकाळी लंडनमध्ये टॅक्सी पकडताना भेटलो होतो. तेव्हा ती मला जितकी सुंदर वाटली होती, अजूनही ती तितकीच सुंदर होती.

‘‘काय झाले?’’ तिने विचारले.

‘‘काही नाही, आम्ही फसलो. त्यांचे दोन गट होते. एका गटाने एका बाजूला थोडा गोळीबार केला आणि आमच्या लँडरोवरच्या दिव्यांवर नजर ठेवली. आम्ही तिथे पोहोचताक्षणीच दुसऱ्या गटाने पूर्वेच्या सरहद्दीला दोन हरणे मारून पळवली.’’

मी कॉफीचा एक घोट घेतला आणि खाली बसलो, ‘‘हे लोक अगदी नियोजन करून येत आहेत. आम्ही जर काळजी घेतली नाही तर कोणाचा तरी बळी जाईल.’’

फ्रान्सुआजने मान डोलावली. तीन दिवसांपूर्वी हे चोर इतके जवळ आले होते की, आमच्या डोक्यावरून गोळ्या जात आहेत, असे आम्हाला

वाटले होते.

"उद्या पोलिसात रिपोर्ट केलेला बरा." ती म्हणाली.

मी काहीच उत्तर दिले नाही. दोन मेलेल्या हरणांच्या प्रकरणात पोलीस लक्ष घालतील, अशी अपेक्षा करणेही अवाजवी होते.

अजून जनावरे मारली गेली आहेत असे मी जेव्हा डोंगाला सांगितले, तेव्हा त्याचा संताप अनावर झाला. मी त्याला का बोलावले नाही, ह्याबद्दल त्याने मला दोष दिला. मी म्हणालो की, मी त्याला संदेश पाठवायचा प्रयत्न केला होता; पण मला काहीच प्रत्युत्तर आले नाही.

"ओह... सॉरी, मिस्टर अँथनी, मी काही मित्रांबरोबर ड्रिंक्स घ्यायला बाहेर गेलो होतो. आता मला जरा ओशाळल्यासारखे वाटते आहे," जरासे अवघडून तो म्हणाला.

त्याच्या हँगओव्हरबद्दल चर्चा करावी, असे मला वाटले नाही. "तू ह्या बाबतीत जरा लक्ष घालशील का?" मी विचारले

त्याने होकारार्थी मान डोलावली. "ह्या हरामखोरांना आपण नक्कीच पकडू यात."

मी परत घरात पोचताच एक फोन वाजला. एका बाईचा आवाज ऐकू आला, तिने आपली ओळख करून दिली. ती 'एलेफंट मॅनेजर अँड ओनर्स असोसिएशन' नावाच्या संस्थेमधून बोलत होती. तिचे नाव 'मॅरीयन गराई' असे होते. ही खासगी संस्था दक्षिण आफ्रिकेतील हत्तींच्या व्यवस्थापकांची आणि मालकांची संस्था आहे. ती हत्तींच्या संवर्धनाचे काम करते. मी त्या संस्थेबद्दल आणि त्यांनी केलेल्या चांगल्या कामाबद्दल ऐकले होते; पण मी काही हत्तींचा मालक नसल्यामुळे माझा त्यांच्याशी थेट संबंध कधी आला नव्हता.

तिच्या मृदू आवाजामुळे मनात आपुलकीची भावना निर्माण झाली.

तिने लगेच मुद्द्याला हात घातला. तिने आधी 'थुला थुला' अभयारण्याबद्दल आणि इथल्या अप्रतिम स्थानिक वन्यसंपदेबद्दल ऐकले होते. ती म्हणाली की, आम्ही स्थानिक लोकांमध्ये वन्यजीव संवर्धनाबद्दल आपुलकी निर्माण करण्यासाठी काम करतो आहोत, हे देखील तिच्या कानावर आले होते. मग ती पुढे म्हणाली की, मला एक हत्तींचा कळप दत्तक घ्यायला आवडेल का? मी काही बोलायच्या आधीच ती पुढे म्हणाली की, आनंदाची बाब म्हणजे

त्यासाठी मला एक दमडीसुद्धा मोजावी लागणार नाही, फक्त त्यांना पकडून इकडे आणण्याचा जो खर्च असेल तो मला करावा लागेल.

मी आश्चर्याने थक्क झालो. हत्ती? जमिनीवरचा सगळ्यात मोठा प्राणी? इथे तर त्यांनी मला अख्खा कळप देऊ केला होता. एक क्षण मला वाटून गेले की कोणी तरी माझी गंमत करते आहे. म्हणजे बघा, तुम्हाला हत्तींचा कळप हवा आहे का, अशी अचानक विचारणा करणारा फोन किती वेळा येतो?

पण मॅरीयन काही थट्टा करत नव्हती.

''ओके,'' मी विचारले, ''ह्या हत्तींच्या बाबतीत नक्की समस्या काय आहे?''

''वेल,'' मॅरीयन म्हणाली, ''एक समस्या आहे. तो कळप तसा त्रासदायक आहे. कोणत्याही ठिकाणाहून ते पळून जायचा प्रयत्न करतात, त्यामुळे त्यांच्या आत्ताच्या मालकांना तो कळप नकोसा झाला आहे. जर मी त्यांचा स्वीकार केला नाही, तर त्या हत्तींना ठार मारले जाईल, म्हणजे अगदी सगळ्या हत्तींना.''

''त्रासदायक असे तू म्हणालीस, म्हणजे काय?''

''त्या कळपाची जी प्रमुख हत्तीण आहे, ती अतिशय हुशार आहे आणि ती नेहमी सुटकेचा मार्ग शोधून काढते. अगदी विजेच्या तारेचे कुंपण घातले, तरीही हे हत्ती पळून जातात. त्या तारा तुटतील इतक्या जोरात ती तारा पिळून काढते नाहीतर दुःख सहन करत सरळ तारा तोडते. ही अगदी अविश्वसनीय बाब आहे. सध्याच्या मालकांना आता हे हत्ती नकोसे झाले आहेत. त्यांनी आमच्या संस्थेला काहीतरी मार्ग काढायला सांगितले आहे.''

मी क्षणभर विचार केला, पाच टन वजनाचा तो महाकाय प्राणी आठ हजार व्होल्ट क्षमतेचा विजेचा धक्का आपण होऊन सहन करत असेल, तर त्यांची इच्छाशक्ती  नक्कीच दांडगी असली पाहिजे.

''आणि लॉरेन्स, त्या कळपात पिल्ले आहेत''

''तू मलाच का फोन केलास?''

मॅरीयनला माझ्या आवाजातली भीती जाणवली असावी. तिने केलेली ही विनंती खूपच विलक्षण होती.

''मी ऐकले की तुझ्याकडच्या प्राण्यांशी तुझे खास नाते आहे,'' ती

म्हणाली. ‘‘मला वाटले ‘थुला थुला’ ही त्यांच्यासाठी योग्य जागा होईल, तू त्यांची योग्य काळजी घेशील आणि तुमची जोडी छान जमेल.’’

तिच्या बोलण्याने मी निरुत्तर झालो. खरेतर, एखाद्या हत्तींच्या कळपासाठी आमची जागा अजून योग्य नव्हती. मी अभयारण्याची स्थिती नुकतीच वठणीवर आणत होतो. आज असेच सिद्ध झाले होते, की चोरीने शिकार होण्याची समस्या आमच्या इथे अतिशय मोठी होती.

मी तिला नाही म्हणणार होतो; पण मी तसे करू शकलो नाही. मला हत्तीबद्दल कायमच आपुलकी वाटत आली आहे. ते केवळ ह्या जगातील सर्वांत मोठे आणि उमदे प्राणी आहेत म्हणून नव्हे, तर आफ्रिकेत जे काही भव्यदिव्य, विलक्षण आहे त्याचे ते प्रतीक आहेत. इथे अचानकपणे मला एक कळप दिला जात होता आणि त्यांना मदतीची गरज होती. अशी संधी मला परत मिळेल का?

‘‘कळप सध्या कोठे आहे?’’

‘‘पुमालांगामधील एका अभयारण्यात आहे.’’

‘पुमालांगा’ हे राज्य दक्षिण आफ्रिकेच्या ईशान्य दिशेला वसलेले होते आणि ह्या देशातील बहुतेक अभयारण्ये त्याच भागात आहेत. ‘क्रुगर नॅशनल पार्क’ सुद्धा त्याच भागात आहे.

‘‘कळपात किती हत्ती आहेत?’’

‘‘नऊ–तीन प्रौढ माद्या आहेत, तीन पिल्ले आहेत, ज्यापैकी एक वयात येणारा नर आहे आणि दोन छोटी पिल्ले आहेत. एकदम सुंदर कुटुंब आहे. जी कुटुंबप्रमुख मादी आहे, तिला एक देखणी मुलगी आहे. तो तरुण नर, त्या कुटुंबप्रमुख मादीचा मुलगा आहे, तो आता पंधरा वर्षांचा झाला आहे आणि तो एक अतिशय उमदा नर आहे.’’

‘‘त्यांच्यामुळे मोठी समस्या निर्माण झाली असली पाहिजे; नाहीतर असे हत्ती कोणी देऊन टाकत नाही.’’

‘‘मी म्हणाले, त्याप्रमाणे कुटुंबप्रमुख मादी सारखी पळून जाते. ती नुसतीच विजेच्या तारा तोडते असे नाही, तर ती आता दाराला लावलेल्या कड्यासुद्धा तिच्या सोंडेने उघडू शकते. मोकळे हत्ती पाहुण्यांच्या कॅम्पच्या आसपास हिंडण्याची कल्पना त्या कळपाच्या सध्याच्या मालकांना एवढी पसंत नाहीये. जर तू त्यांचा स्वीकार केला नाहीस, तर त्या कळपाला

नक्कीच ठार केले जाईल. म्हणजे प्रौढ हत्तींना तरी नक्कीच.''

मी एकदम गप्प झालो, ही सगळी माहिती पचवायचा मी प्रयत्न करत होतो. संधी खूपच मोठी होती ह्यात शंका नाही, पण धोकाही खूपच होता.

आमच्या आजूबाजूला मोकाट सुटलेल्या शिकाऱ्यांचे काय करायचे, ही एक मोठी समस्या होती–हस्तिदंताच्या लालसेमुळे अजून शिकारी आमच्या अभयारण्याकडे आकर्षित तर होणार नाहीत ना? आमच्याकडच्या वेगवान रायफलचा शिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष उपयोग होत नव्हता, मग हत्तींना काबूत ठेवण्यासाठी माझ्या पूर्ण अभयारण्याला विजेच्या तारेचे कुंपण घालावे लागेल त्याचे काय? त्यांना त्यांच्या ह्या नवीन घराची सवय होईपर्यंत एका ठिकाणी वेगळे ठेवावे लागेल, त्यासाठी आमच्या इथे आत अजून एक कुंपण बांधावे लागेल त्याचीही व्यवस्था बघावी लागणार होती. हे सगळे करण्यासाठी माझ्याकडे पुरेसा पैसा आहे का आणि मनुष्यबळाचे काय?

ते हत्ती त्रासदायक आहेत, असे म्हणताना मॅरीयन कचरली नाही. त्याचा अर्थ काय? ते फक्त पळून जाण्यात पटाईत आहेत एवढेच का? का हा खरोखरच एक गुंड कळप आहे, ज्यांच्या मनात मानवाबद्दल तिरस्कार भरलेला असल्यामुळे, ते अभयारण्यात जिथे माणसांचा वावर असतो तिथे ठेवायला धोकादायक होऊन गेले आहेत?

ते काहीही असले तरी हा संकटात असलेला कळप होता. कितीही धोका असला, तरी मला माहीत होते माझे उत्तर काय असणार आहे ते.


''काही असो.'' मी उत्तर दिले, ''मी त्यांना स्वीकारतोय.''

◆

## नवी संहिता... नवा आशय...

TBC-34 Book No. 2

# सिकॅमोर रो




**जॉन ग्रिशॅम**

अनुवाद


**सुदर्शन आठवले**

एक मृत्युपत्र आणि भावनांचा कल्लोळ...
सेथ हबर्ड होता करुणेचा सागर

**किंमत : ९९९/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

TBC-34 Book No. 3

# आय ऑफ द नीडल




**केन फोलेट**


अनुवाद

**महेश कार्लेकर**

एक जर्मन हेर आणि ब्रिटिश गुप्तहेर संस्था यांच्यातील थरारक संघर्षाचं उत्कंठावर्धक चित्रण

**किंमत : ५५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून




# हेड्स यू विन

**जेफ्री आर्चर**

अनुवाद

**पूर्णिमा कुंडेटकर**

*मास्टर स्टोरी टेलर यांची नवी अफलातून कादंबरी...*

### अलेक्झांडर

### लेनिनग्राड, १९६८

‘‘शाळेतून बाहेर पडल्यावर तू काय करणार आहेस?’’ अलेक्झांडरने विचारलं.

‘‘बहुतेक मी केजीबीमध्ये भरती होईन,’’ व्लादिमिर उत्तरला, ‘‘मला जर राज्याच्या विद्यापीठात जागा मिळाली नाही, तर ते माझा विचारही करणार नाहीत. तू काय करणार आहेस?’’

‘‘मी लोकशाही पद्धतीने निवडून आलेला रशियाचा पहिला राष्ट्राध्यक्ष होणार आहे,’’ अलेक्झांडर हसत म्हणाला.

‘‘जर तू खरंच झालास,’’ व्लादिमिर न हसता म्हणाला, ‘‘तर, तू मला केजीबी प्रमुख म्हणून नियुक्त करू शकतोस.’’

‘‘मला घराणेशाही मान्य नाही,’’ अलेक्झांडर म्हणाला. ते दोघे बोलत बोलत शाळेच्या आवारातून बाहेर पडले आणि रस्त्याला लागले.

‘‘घराणेशाही?’’ ते घराच्या दिशेने चालत असताना व्लादिमिरने विचारलं.

‘‘इटालियन शब्द, नेफ्यूपासून तयार झालेला शब्द आहे नेपोटिझम अर्थात घराणेशाही. हा खूप जुना पोपच्या काळातील म्हणजे साधारण सतराव्या शतकातील शब्द आहे. त्या वेळी पोप आपले अधिकार आपल्या नातेवाईक आणि जवळच्या मित्रांना सुपूर्द करत असत.’’

‘‘मग त्यात चुकीचं काय आहे?’’ व्लादिमिर म्हणाला, ‘‘तू फक्त पोपच्या ऐवजी केजीबी म्हणून मला नियुक्त कर.’’

‘‘तू शनिवारी मॅचला जाणार आहेस का?’’ अलेक्झांडरने विषय बदलण्यासाठी विचारलं. ‘‘नाही. एकदा का झेनित एफ.सी. उपांत्य फेरीत पोहोचले की, माझ्यासारख्या कोणाला तिकिटं मिळण्याची शक्यताच नसते; पण तुझे वडील गोदीमध्ये पर्यवेक्षक असल्यामुळे पक्षाच्या सदस्यांसाठी राखीव स्टॅन्डमधील दोन जागा तुला आपोआपच खात्रीने मिळतील. नाही का?’’

‘‘नाही, जोपर्यंत ते कम्युनिस्ट पक्षात सहभागी व्हायला नकार देत आहेत तोपर्यंत तरी नाही,’’ अलेक्झांडर म्हणाला. ‘‘आणि मी त्यांना जेव्हा शेवटचं विचारलं होतं तेव्हा तिकीट मिळण्याबाबत ते अजिबात आशावादी वाटले नाहीत; त्यामुळे आता कोल्यामामावरच सारी भिस्त आहे.’’

ते पुढे चालत राहिले तेव्हा अलेक्झांडरच्या लक्षात आलं की, ते दोघेही त्यांच्या डोक्यात असलेला मुख्य विषय टाळत होते.

‘‘तुला काय वाटतं, आपल्याला कधी समजेल?’’

‘‘काही कल्पना नाही,’’ अलेक्झांडर म्हणाला. ‘‘मला वाटतं, आपल्या शिक्षकांना आपल्याला तडफडताना पाहायला फार आवडतं; अर्थात आपल्यावर अधिकार गाजवण्याचे त्यांचे दिवस आता संपत आले आहेत, हे त्यांना माहीत आहे.’’

''तुला कशाचीही काळजी करायची गरज नाही,'' व्लादिमिर म्हणाला. ''तुझ्या बाबतीत फक्त एकच निर्णय व्हायचा आहे; तू मॉस्कोमधील परदेशी भाषा संस्थेमध्ये लेनिन शिष्यवृत्ती मिळवलीस की, राज्य विद्यापीठात गणिताचा अभ्यास करण्यासाठी तुला जागा देऊ केली जाईल. मला मात्र विद्यापीठामध्ये जागा मिळेल की नाही याचीही खात्री नाही आणि जर मिळाली नाही, तर केजीबीत भरती होण्याची माझी संधी हुकणार,'' त्याने सुस्कारा सोडला. ''मग मला आयुष्यभर तुझ्या वडिलांच्या हाताखाली गोदीवर काम करावं लागेल.''

अलेक्झांडरने काहीच मत व्यक्त केलं नाही. ते दोघं चालत चालत, ते राहत असलेल्या चाळीपर्यंत पोहोचले आणि त्यांच्या फ्लॅटकडे जाणाऱ्या तुटक्याफुटक्या दगडी पायऱ्या चढू लागले.

''मी नवव्या मजल्याऐवजी पहिल्या मजल्यावर राहत असतो तर किती बरं झालं असतं.''

''तुला चांगलं माहीत आहे व्लादिमिर, केवळ पक्षाच्या सदस्यांनाच पहिल्या तीन मजल्यांवर राहता येतं; पण मला खात्री आहे की, एकदा का तू केजीबीमध्ये भरती झालास की, तुला खालच्या जगात येता येईल.''

''चल, सकाळी भेटू,'' मित्राच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून व्लादिमिर म्हणाला आणि बाकीचे चार मजले चढू लागला.

अलेक्झांडरने पाचव्या मजल्यावरच्या आपल्या लहानशा घराचं दार उघडलं तेव्हा त्याला अलीकडेच राज्य मासिकामध्ये वाचलेला एक लेख आठवला; त्यात म्हटले होते की, अमेरिकेमध्ये गुन्हेगारी इतकी वाढली आहे की, प्रत्येकजण समोरच्या दरवाजाला किमान दोन कुलपं लावतो. सोव्हिएत युनियनमध्ये असं करावं लागत नाही, कारण बहुधा कोणाच्याही घरामध्ये चोरण्यासारखं काहीच नसतं.

तो सरळ त्याच्या बेडरूममध्ये गेला. त्याला माहीत होतं की, गोदीवरची तिची वेळ संपेपर्यंत आई काही घरी परत येणार नाही. त्यानं रेघांच्या कागदांचा गठ्ठा, पेन्सिल आणि वाचून जीर्ण झालेलं एक पुस्तक आपल्या पिशवीतून बाहेर काढलं आणि खोलीच्या कोपऱ्यात असलेल्या लहानशा टेबलावर ठेवलं. टॉलस्टॉयच्या 'वॉर ॲन्ड पीस'चं पान क्रमांक १७९ उघडून त्याने त्याचा इंग्रजीत अनुवाद सुरू केला. *'त्या रात्री जेव्हा रोस्तोव*

*कुटुंब जेवायला बसलं तेव्हा निकोलाइचं लक्ष दुसरीकडेच कुठेतरी होतं असं दिसत होतं आणि हे केवळ..'*

अलेक्झांडर स्पेलिंगसाठी आणि आणखी चपखल इंग्रजी शब्द सापडतो का हे पाहण्यासाठी, प्रत्येक ओळ दोनदा तपासत होता; तेवढ्यात त्याला दार उघडल्याचा आवाज आला. त्याच्या पोटात गुरगुरायला लागलं आणि तो विचार करू लागला की, आईला ऑफिसर्स क्लबमधून त्याच्यासाठी काही इटुक-मिटुक चोरून आणता आलं असेल का? त्याची आई क्लबमध्ये कुक होती. त्यानं पुस्तक बंद केलं आणि तो स्वयंपाकघरात गेला.

तो टेबलापाशी लाकडी बाकावर बसत असताना एलिना त्याच्याकडे पाहून प्रेमाने हसली.

''आज काही खास मिळालं का, आई?'' अलेक्झांडरने आशेनं विचारलं.

ती पुन्हा हसली आणि तिने तिचे खिसे रिकामे करायला सुरुवात केली. एक मोठा बटाटा, दोन पार्सनिप्स, ब्रेडची अर्धी लादी आणि आज संध्याकाळी लागलेली लॉटरी, एक मांसाचा मोठा तुकडा. दुपारच्या जेवणाच्या वेळी बहुधा एखाद्या अधिकाऱ्याने ताटात सोडून दिला असावा. अलेक्झांडरच्या मनात आलं की, त्याचा मित्र व्लादिमिरला जे काही खायला मिळणार आहे, त्या तुलनेत मला आज मेजवानीच मिळाली आहे. तुमच्यापेक्षा दुःखी कोणीतरी असतंच, त्याची आई नेहमी म्हणायची.

''काही बातमी मिळाली का?'' एलिनानं बटाटा सोलताना विचारलं.

''आई, रोज रात्री काय तोच प्रश्न विचारतेस? मी तुला रोज हेच सांगतो की, अजून निदान महिनाभर किंवा कदाचित त्याहून जास्तच वेळ लागेल, एवढ्यात काहीही समजणार नाही.''

''मला फक्त एवढंच वाटतं की, तुला जर लेनिन शिष्यवृत्ती मिळाली तर तुझ्या वडिलांना खूप अभिमान वाटेल.'' तिनं एकीकडे बटाटा आणि एकीकडे साल ठेवलं. काहीही वाया घालवायचं नाही. ''तुला माहीत आहे, जर युद्ध सुरू झालं नसतं तर तुझे वडील विद्यापीठात शिकायला गेले असते.''

अलेक्झांडरला हे माहीत होतं; पण त्याला या आठवणीने नेहमी बरं वाटायचं की, लेनिनग्राडला घेराव पडला होता तेव्हा त्याचे वडील पूर्वेकडच्या आघाडीवर कॉर्पोरल म्हणून नियुक्त होते आणि रणगाड्यांच्या एका विभागाने

सतत त्र्याण्णव दिवस त्यांच्या विभागावर हल्ला करूनही, जर्मनांनी शस्त्र टाकून माघार घेईपर्यंत त्यांनी त्यांची चौकी सोडली नव्हती.

''त्यासाठी त्यांना 'लेनिनग्राडचा रक्षक' हा पुरस्कारही मिळाला होता,'' अलेक्झांडर तंद्रीत म्हणाला.

त्याच्या आईनं निदान शंभर वेळा त्याला ही गोष्ट सांगितली असेल; पण अलेक्झांडरला याचा कधी कंटाळा आला नाही. त्याच्या वडिलांनी मात्र हा विषय कधीच काढला नाही. या गोष्टीला आता जवळपास पंचवीस वर्षं लोटली होती आणि गोदीवर परत आल्यावर त्यांना पदोन्नती मिळून ते आता कॉम्रेड प्रमुख पर्यवेक्षकपदावर पोहोचले होते. त्यांच्या हाताखाली ३,००० लोक काम करत. जरी ते पक्ष सदस्य नसले, तरी या कामासाठी ते एकमेव पात्र व्यक्ती आहेत हे अगदी केजीबीनंही मान्य केलं होतं.

समोरचा दरवाजा उघडल्याचा आणि धाडकन बंद झाल्याचा आवाज आला. म्हणजे त्याचे वडील घरी आले होते. अलेक्झांडरने स्मित केलं आणि ढांगा टाकत स्वयंपाकघरात गेला. उंच आणि मजबूत बांध्याच्या कॉनस्टंटिन कारपेन्कोचं व्यक्तिमत्त्वच असं होतं की, आजही तरुण स्त्रियांना वळून बघणं भाग पडत असे. उन्हात रापलेल्या त्याच्या चेहऱ्याला भरघोस मिशांनी शोभा आलेली होती. त्यांच्याशी लहानपणी अलेक्झांडर खेळायचा आणि आता अनेक वर्षांत त्यांना हात लावायची त्याची हिंमत झाली नव्हती. कॉनस्टंटिन लेकाच्या समोरच्या बाकावर बसला.

''जेवण तयार व्हायला अजून अर्धा तास लागेल,'' एलिना बटाटा चिरता चिरता म्हणाली.

''घरात एकटं असताना आपण फक्त इंग्लिश बोललं पाहिजे,'' कॉनस्टंटिन म्हणाला.

''का?'' एलिनानं तिच्या स्थानिक भाषेत विचारलं. ''मी माझ्या पूर्ण आयुष्यात कधीही इंग्लिश माणसाला भेटलेली नाही आणि भेटण्याची शक्यताही नाही.''

''कारण जर अलेक्झांडरला शिष्यवृत्ती मिळवून मॉस्कोला जायचं असेल तर त्याला आपल्या शत्रूची भाषा अस्खलितपणे आली पाहिजे.''

''पण बाबा, युद्धात ब्रिटिश आणि अमेरिकन एकाच बाजूने तर लढले होते ना.''

''एकाच बाजूने, होय खरं आहे.'' त्याचे वडील म्हणाले, ''याचं एकमेव कारण हे होतं की, त्या दोन शत्रूंच्या तुलनेत आपण कमी त्रासदायक आहोत असं त्यांना वाटत होतं.'' अलेक्झांडर यावर विचार करत असताना त्याचे वडील उठून उभे राहिले. ''जेवण होतं आहे तोपर्यंत आपण बुद्धिबळाचा एक डाव टाकायचा का?'' ते म्हणाले. अलेक्झांडरने मान डोलवली. दिवसभरातील हा त्याचा सर्वांत आवडता वेळ होता. ''तू सोंगट्या मांड तोपर्यंत मी तोंड, हातपाय धुऊन येतो.''

कॉनस्टंटिन खोलीतून जाताच एलिना कुजबुजली, ''जरा बदल म्हणून त्यांना का जिंकू देत नाहीस?''

''अजिबात नाही,'' अलेक्झांडर म्हणाला. ''तसं केलं तर त्यांना समजेल की, मी पुरेसे प्रयत्न केले नाहीत आणि मग ते मला मात देतील.'' स्वयंपाकघराच्या टेबलाखालचा ड्रॉवर उघडून त्यानं जुना लाकडी पट आणि सोंगट्यांची पेटी काढली. त्यातली एक सोंगटी हरवली होती; त्यामुळे रोज रात्री प्लॅस्टिकचं मिठाचं भांडं उंटाची जागा घेई.

बाबा परत येण्यापूर्वी अलेक्झांडरने आपल्या राजाचं प्यादं दोन चौकटी पुढे सरकवलं होतं. कॉनस्टंटिननी लगेच आपल्या वजिरापुढचं प्यादं एक चौकट पुढे सरकवून त्याला उत्तर दिलं.

''तुझी मॅच कशी झाली?'' त्यांनी विचारलं.

''आम्ही तीन-शून्यने जिंकलो,'' अलेक्झांडर म्हणाला आणि त्याने आपला घोडा हलवला.

''आणखी एक क्लीन शीट, शाब्बास!'' कॉनस्टंटिन म्हणाले. ''तसं तर अनेक वर्षांपासून तूच तुझ्या शाळेत सर्वोत्तम गोलकीपर आहेस; पण तरीही ती शिष्यवृत्ती जिंकणं महत्त्वाचं आहेच. मी असं गृहीत धरतो की, तुला अजून काही समजलेलं नाही.''

''काहीही नाही,'' अलेक्झांडर म्हणाला आणि त्यानं पुढची चाल केली. क्षणात त्याच्या वडिलांनी आपली चाल केली. ''बाबा, एक विचारू? तुम्हाला शनिवारच्या मॅचचं तिकीट मिळालं का?''

''नाही,'' त्याच्या वडिलांनी पटावरची नजर न हलवता उत्तर दिलं. नेव्हस्की प्रॉस्पेक्टवरील कुमारिकेपेक्षाही ते दुर्मिळ आहे.

''कॉनस्टंटिन!'' एलिना म्हणाली. ''तू कामावर असताना गोदी

कर्मचाऱ्यासारखा वागू-बोलू शकतोस; पण घरात नाही.''

कॉनस्टंटिननी हसून आपल्या मुलाकडे पाहिलं. ''पण तुझ्या कोल्यामामाला गच्चीवरची दोन तिकिटं मिळणार आहेत आणि मला काही जाण्यात रस नाही तेव्हा...'' अलेक्झांडरच्या वडिलांनी पुढची चाल केली आणि त्याने हवेत उडी मारली; शेवटी ते त्याचं लक्ष विचलित करण्यात यशस्वी झाले होते.

''तू पक्षाचा सदस्य व्हायचं मान्य केलं असतंस,'' एलिना म्हणाली, ''तर तुला हवी तेवढी तिकिटं मिळाली असती.''

''तुला माहिती आहे, मला तसं काही करायचं नाही. क्विड प्रो को. तूच मला ही संज्ञा शिकवली आहेस,'' टेबलापलीकडील आपल्या मुलाकडे नजर टाकत कॉनस्टंटिन म्हणाला. ''त्या बदल्यात बरीच मोठी किंमत मोजावी लागेल हे विसरू नकोस आणि फुटबॉल मॅचच्या दोन तिकिटांसाठी मी माझ्या मित्रांना नदीवर नेऊन विकणार नाही.''

''पण अनेक वर्षांपासून आपण हा चषक मिळवण्यासाठी उपांत्य फेरीपर्यंतही पोहोचलेलो नाही,'' अलेक्झांडर म्हणाला.

''आणि माझ्या आयुष्यात पुन्हा असं काही घडेलसं वाटत नाही; पण कम्युनिस्ट पक्षामध्ये मला सहभागी करून घेण्यासाठी त्यांना यापेक्षा बरंच काही करावं लागेल.''

''व्लादिमिर आधीच त्यात अग्रेसर आहे आणि त्यानं कोमसोमोलसाठी नावनोंदणीसुद्धा केली आहे,'' आपली पुढची चाल करत अलेक्झांडर म्हणाला.

''फार काही आश्चर्याची गोष्ट नाही,'' कॉनस्टंटिन म्हणाले. ''नाही तर त्याला केजीबीमध्ये भरती होण्याची संधी मिळाली नसती. त्याच्यासारख्या डबक्यात राहणाऱ्यांसाठी तेच नैसर्गिक वातावरण आहे.''

पुन्हा एकदा अलेक्झांडरचं लक्ष विचलित झालं. ''तुम्ही नेहमी त्याच्याबद्दल असं का बोलता, बाबा?''

''कारण तो आहे लहान, पण हरामखोर आहे; त्याच्या बापासारखा. लक्षात ठेव, त्याला कधीही कोणतंही गुपित सांगू नकोस, कारण तू घरी पोहोचायच्या आधी ते गुपित केजीबीकडे पोहोचलेलं असेल.''

''तो इतका काही हुशार नाही,'' अलेक्झांडर म्हणाला. ''खरं सांगायचं तर त्याला राज्याच्या विद्यापीठात नशिबानेच जागा मिळेल.''

''तो हुशार नसेल, कदाचित; पण तो धूर्त आणि क्रूर आहे. हे फार

धोकादायक मिश्रण आहे. माझ्यावर विश्वास ठेव, तो अंतिम फेरीच्या तिकिटासाठी आपल्या आईलासुद्धा विकेल; कदाचित उपांत्य फेरीच्या तिकिटासाठीसुद्धा.''

''जेवण तयार आहे,'' एलिना म्हणाली.

''आपण मॅच ड्रॉ करायची का?'' कॉनस्टंटिन म्हणाले.

''अजिबात नाही, बाबा. मी फक्त सहा चालींमध्ये तुम्हाला शह देईन आणि तुम्हाला हे माहीत आहे.''

''तुम्ही दोघं भांडण थांबवा,'' एलिना म्हणाली, ''आणि टेबलावर ताटं मांडा.''

''मी तुला शेवटचं कधी हरवलं होतं? कॉनस्टंटिन आपला राजा बाजूला ठेवत म्हणाले.


''एकोणीस नोव्हेंबर, १९६७,'' अलेक्झांडर म्हणाला आणि दोघांनी उठून एकमेकांशी हस्तांदोलन केलं.

◆

**नवी संहिता... नवा आशय...**

**शिवपत्नी महाराणी सईबाई**


**डॉ. सुवर्णा नाईक-निंबाळकर**




छत्रपती शिवरायांना सावलीसारखी सोबत करणाऱ्या आणि स्वराज्यघडणीच्या प्रवासात स्वत:च्या कौटुंबिक सुखाची तमा न बाळगणाऱ्या महाराणीचा लक्षवेधी जीवनप्रवास

**किंमत : २८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून







**एस. हुसैन झैदी**

अनुवाद

**वर्षा वेलणकर**

*सायबर गुन्ह्यांच्या साखळीची पोलखोल करणाऱ्या मुंबई पोलिसांच्या धाडसाची गुंतवून ठेवणारी कहाणी...*

‘‘**टी**म एक, तयार.’’

‘‘टीम दोन, तयार.’’

‘‘टीम तीन, तयार.’’

‘‘सर्व टीम, लक्षपूर्वक ऐका. ईगल, बारकाईने बघून सांगा काय आहे तुमच्या नजरेसमोर?’’

‘‘आकाश अगदी स्वच्छ आहे सर. कुठेही मळभ नाही. आत-बाहेर करण्यासाठी फक्त एकच एन्ट्री आहे आणि त्याची आपण

आधीच छाननी केली आहे सर.''

''उत्तम. सावध राहा.''

''हो सर.''

गेल्या एक तासापासून ताटकळलेल्या तयारीचा पोलीस अधीक्षक समर देवने फोनच्या मेसेज बॉक्सकडे लक्ष वळवले. या विशिष्ट कामगिरीसाठी त्याने स्वतःसाठी 'ईगल' हे संबोधन निवडले होते. प्रचंड ताणलेली उत्सुकता व्यक्त करण्यासाठी त्याने मेसेज टाईप करायला सुरुवात केली.

''सर, मला हे मान्य केलंच पाहिजे. हे सगळं जे आपण करतो आहे ते खूप रोमांचक आहे आणि मी खूप उत्साहात आहे सर.''

''तू आणि मी सुद्धा देव. आपण दोघेही,'' पोलीस महानिरीक्षक विक्रांत सिंग यांनी ताबडतोब त्याला उत्तर पाठवले.

आधी पोलीस उप-महानिरीक्षक, नंतर रॉ (RAW) आणि आता तीनच महिन्यांपूर्वी खूप काळ रखडलेली इन्स्पेक्टर जनरलची बढती मिळालेल्या विक्रांत सिंगला पोलीस महानिरीक्षक पदाच्या कार्यभाराबरोबरच महाराष्ट्राच्या सायबर गुन्हे शाखेची संपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली होती. सायबर गुन्हे हेच गुन्हेगारीचे भविष्य आहे हे सरतेशेवटी मान्य करून, प्रत्येक शहरात फक्त एखादी चौकी किंवा एक विभाग या अपराधांना आळा घालण्यास पुरेसा ठरणार नाही, असा विचार करत सरकारने एक वर्षांपूर्वी ही संस्था महाराष्ट्रात कार्यान्वित केली होती.

राज्यातील सर्व सायबर गुन्हे संबंधित पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून होणाऱ्या तपास कामांवर लक्ष ठेवणे, ही प्राथमिक जबाबदारी सांभाळताना, देशभरातील सायबर गुन्ह्यांवर आळा घालण्याचे काम करणाऱ्या दिल्लीतील कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम (CERT) या विभागाचे नोडल कार्यालय म्हणून देखील ही संस्था स्थापित झाली होती. पर्यायाने इथे मिळणारी बढती प्रतिष्ठेची ठरणार होती. त्यामुळेच केंद्रीय गुप्तचर संस्थांमधे काम करण्याचा भरपूर अनुभव गाठीशी असणाऱ्या विक्रांत सिंग यांच्याकडे ही जबाबदारी देण्यात आली.

''सर, टारगेट आगेकूच करत आहे. पुन्हा सांगतो, टारगेट आगेकूच करत आहे''

''कोण बोलतंय?'' विक्रांतने सूचना ऐकून विचारणा केली. नेहमीच्या बिनतारी रेडिओऐवजी ते पहिल्यांदाच कॉन्फरन्स कॉलच्या माध्यमातून परस्परांच्या

संपर्कात होते. बिनतारी रेडिओ वापरताना बोलण्याचा खूप आवाज व्हायचा आणि मग पोलिसांच्या छुप्या कामगिरीची वाट लागायची. त्यामुळे अशा संवेदनशील, गुप्त मोहिमांसाठी ही नवीन पद्धत अमलात आणली गेली होती. पण गुप्त मोहिमांसाठी ही पद्धत कुचकामी आहे, असे विक्रांतचे मत होते. त्याने आपला वायरलेस रेडिओ बरोबर आणला होता. पण तो बंद करून गाडीतच सीटखाली लपवून ठेवला.

''माफ करा सर, मी टीम क्रमांक दोन बोलतोय,'' विक्रांतच्या प्रश्नाला उत्तर आले.

विक्रांतने या पहिल्याच सूचनेकडे दुर्लक्ष केले. त्यांच्या टीममध्ये असलेले पोलीस दलाचे लोक अशा प्रकारच्या मोहिमेसाठी पहिल्यांदाच काम करत होते. त्यांनी पदाची जबाबदारी घेण्यापूर्वी ही सगळी मंडळी खूप काळ फक्त कार्यालयीन कामे करायची. त्यांना तसे करण्यास अक्षरशः भाग पाडले होते, असे म्हणायलाही हरकत नव्हती. ऑफिसच्या खुर्च्या आणि त्यांची कामाची जागा याव्यतिरिक्त एकदम गुन्ह्याच्या ठिकाणी अशा पद्धतीने काम करण्याची त्यांना सवय नव्हती. त्यात या कर्मचाऱ्यांचा काहीच दोष नव्हता याची विक्रांतला जाणीव होती. त्यांच्या आधीच्या बॉसने पाडलेल्या पायंड्याचे ते तंतोतंत पालन करत होते, इतकेच.

ही मोहीम मुंबईच्या मेट्रो सिनेमाच्या सिग्नलजवळ आखण्यात आली होती, हेच खूप आव्हानात्मक होते. शहराच्या अति महत्त्वाच्या म्हणून गणल्या गेलेल्या साऊथ मुंबईकडे जाणारे तब्बल पाच रस्ते या एका ठिकाणाहून जातात. ही सगळी टीम एका मोडकळीला आलेल्या इमारतीवर लक्ष रोखून होती. शिवाय पालिकेशी असलेल्या वादामुळे तिथे कुणी रहिवासी नसावा, असा अंदाज बांधला गेला होता. एका लोकप्रिय इराणी कॅफेच्या शेजारी उभ्या असलेल्या या जीर्ण वास्तूकडे लोक क्षणभरही नजर टाकण्याची तसदी न घेताच पुढे निघून जात असत.

आणि म्हणूनच लहान मुलांशी संबंधित अश्लील व्हिडिओ करणाऱ्यांसाठी ही जागा अगदी मोक्याची होती. याबद्दलची माहिती सायबर गुन्हे शाखेला जर्मनीतील एका सायबर सुरक्षा संस्थेकडून मिळाली होती. त्यांच्या संस्थेमार्फत होणाऱ्या एका नित्याच्या ऑडिटमध्ये त्यांना अशा व्हिडिओच्या संख्येत अचानक खूप वाढ झाल्याचे लक्षात आले आणि हे सगळे व्हिडिओ

भारतातील एका आयपी ॲड्रेसवरून इंटरनेटवर येत असल्याचे त्यांना दिसले. नव्वद दिवसांकरता तो ऑडिट रिपोर्ट प्रकाशित करण्याचे स्थगित करून त्यांनी ही माहिती आधी भारताच्या संबंधित विभागाला दिली होती.

विक्रांत यांनी तब्बल दोन महिने अगदी संयम ठेवून याबाबत तपास केला आणि त्यांच्या असे लक्षात आले, की या सगळ्या हालचाली मुंबईतून होत आहेत. शहराच्या नेमक्या कुठल्या भागातून हे अश्लील व्हिडिओ इंटरनेटवर टाकले जात आहेत आणि हे काम कसे चालते, याबाबत निश्चित माहिती काढण्यासाठी विक्रांत आणि त्यांच्या टीमला थोडा वेळ लागला. त्यांनी आपल्या काही जुन्या खबऱ्यांनाही कामाला लावून त्या आयपी ॲड्रेससंदर्भात आणखी माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. कुठल्याही तांत्रिक माहितीपेक्षा मानवी बुद्धिमत्ता समस्या सोडवायला जास्त मदतीची ठरते, हा आजवर विक्रांतचा अनुभव होता.

''टीम दोन, इमारतीकडे एक व्यक्ती चालून येत आहे.''

''कॉपी,'' विक्रांतने तातडीने उत्तर दिले.

''ईगल बोलतोय. एक पुरुष इमारतीत येतोय, याची खात्री करा. इतर कुणीही आत येत नाहीय.''

मेट्रो सिनेमाच्या अगदी प्रवेशद्वाराजवळ असलेल्या एका मोठ्या फलकाच्या वरच्या भागावर देव एका मजुराच्या वेशात बसला होता. ही जागा टेहळणीसाठी अगदी योग्य होती. दुर्बीण न वापरता इथून आजूबाजूच्या परिसरावर नजर ठेवणे सहज शक्य होते. खूप उंचही नाही आणि अगदी जमिनीवरही नाही, असे हे ठिकाण होते.

खरे तर स्वतः विक्रांत किंवा देव यांना या कामगिरीत सहभागी होण्याची गरज नव्हती. विभागातील इतर स्टाफने ही कामगिरी अगदी सहज हातावेगळी केली असती. पण मिळालेली बढती खुर्चीला बांधून ठेवणार असेल तर त्यातले औत्सुक्य संपते, ही भावना विक्रांतच्या मनात होती आणि सायबर गुन्हे शाखेत आल्यानंतर अशी प्रत्यक्ष गुन्ह्याच्या जागी काम करण्याची देव याची ही पहिलीच वेळ होती. कुठल्याही कामात स्वतःला झोकून देण्याची वृत्ती आणि कामाचा उत्साह, या दोन गुणांमुळे तो शाखेत विक्रांतच्या सगळ्यात जवळची व्यक्ती बनला होता.

''होम बेस तय्यार?'' विक्रांतने विचारणा केली.

तिकडे कार्यालयात बसून तांत्रिक मदत पुरवणाऱ्या टीमने तत्काळ

उत्तर दिले, ''हो सर.''

कारवाईच्या जागेवर लावलेल्या प्रत्येक सीसीटीव्हीचे फूटेज विक्रांतने मागवून घेतले होते आणि इथून मिळणारे प्रत्यक्ष फूटेज पाहण्याची रीतसर परवानगी आणि व्यवस्था त्याच्यासाठी करून देण्यात आली होती. त्यामुळे कुणी इथून पळून जाण्याचा प्रयत्न केलाच असता, तर ऑफिसमध्ये बसलेल्या टीमला या प्रत्यक्ष फूटेजमधून पाठलाग करणे सोपे होणार होते.

कारवाईच्या ठिकाणापासून दिसणार नाही अशा अंतरावर असलेल्या आपल्या गाडीतून विक्रांत अगदी सावकाश बाहेर आला. फोन त्याने आपल्या खिशात ठेवला आणि वायरलेस ब्लूटूथचे रिसिव्हर कानात नीट बसले आहे की नाही याची खात्री करून घेतली. मग ते चालू लागला.

अगदी काही पावले पुढे आल्यावर एक वळण घेताच ती इमारत त्यांच्या नजरेच्या टप्प्यात आली. त्याने आदेश देण्यास सुरुवात केली. :

''सगळ्या टीमने लक्षात घ्या, पुढे चला. पुन्हा सांगतोय, पुढे व्हा.'''

त्यांच्या आदेशाप्रमाणे एकदम हरकतीत आलेल्या प्रत्येक टीमकडून त्यांच्यावर उत्तरांचा भडिमार झाला. त्या भग्न इमारतीच्या अगदी शेजारी असलेल्या बारमधून टीम एकचे लोक बाहेर पडले. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या एका छोट्या शॉपिंग सेंटरमधून टीम दोनने इमारतीकडे आगेकूच केली. तीन नंबरची टीम इराणी कॅफेमधून अवतरली. जाहिरात फलकावर चढून बसलेला देव भरभर खाली उतराला आणि इमारतीच्या दिशेने चालू लागला.

''होम बेस, फोन लावा.''

होकार देऊन ऑफिसमधल्या तांत्रिक टीमने लगेच पोलीस कंट्रोल रूमला कारवाईची माहिती पुरवली आणि जवळच्या पोलीस कर्मचाऱ्यांना तातडीने कारवाईच्या ठिकाणी जाण्यास सांगितले. पिस्तूल बाहेर काढून आणि रोखून ठेवत तीनही टीम इमारतीच्या आत जाऊ लागल्या. अगदी दारात पहारा देत उभ्या असलेल्या दोन व्यक्तींना बंदूक दाखवून आत जाण्यास सांगण्यात आले. आतल्या खोलीत जाताच, ''पोलीस!'', ''हॅन्ड्स अप! हॅन्ड्स अप'' अशा आरोळ्या देत सर्व टीम सदस्य खोलीत आपापली जागा घेत पसरले.

खोलीच्या दाराशी विक्रांत आणि देव हातात पिस्तूल घेऊन सावध थबकले. पाठीमागून कुणी येत नाही याची खात्री करत दुसऱ्याच क्षणी

त्यांनी खोलीत प्रवेश केला. अश्लील व्हिडिओचा धंदा अगदी जोरात चालू असल्याने हे काम करणारे स्वतःच्या रक्षणासाठी कुठल्याही थराला जाऊ शकतात, याची त्यांना जाणीव होती.

आत तीन माणसे होती. त्यातील एकाला त्यांनी इमारतीच्या आत येताना पाहिले होते. त्याच्या हातात असलेले हार्ड ड्राईव्ह तो खुर्चीत बसलेल्या माणसाच्या हातात देत होता. म्हणजेच तो माणूस या व्हिडिओचा वितरक होता आणि इतर दोघे तो व्हिडिओ डार्क वेबवर टाकण्याचे काम करत होते.

विक्रांतची नजर संपूर्ण खोलीवरून एकवार फिरली आणि ते जागीच थांबले. खोलीत तीन संगणक आणि तीन खुर्च्या होत्या. पण तिथे फक्त दोनच व्यक्ती उभ्या होत्या.

हे सगळे टिपत असतानाच त्याच्या कानातील रिसीव्हरमध्ये आवाज आला. होम बेस माहिती देत होते.

''एक जण पळून गेला आहे सर! इमारतीच्या दुसऱ्या बाजूच्या एका खिडकीतून त्याने उडी मारली आणि तो मरीन लाइन्सच्या दिशेने धावतो आहे.''

''टीम एक, माझ्यासोबत या,'' खिडकीकडे झेप घेत विक्रांतने आदेश दिला. देवदेखील त्यांच्या मागे धावला. दोघांनीही खिडकीबाहेर सहज उडी मारली.

पळून जाणाऱ्या माणसाला ओळखणे कठीण नव्हते कारण त्या सगळ्या रस्त्यावरच्या गर्दीत धावत जाणारा तो एकमेव होता. विक्रांत आणि देव त्याच्यामागे प्रचंड वेगाने धावत सुटले. देवने मागे वळून टीम एककडे नजर टाकली आणि त्यांना रस्त्याच्या समांतर जाणाऱ्या बाजूच्या बोळातून जाण्याचा इशारा केला आणि आरोपीला पुढे गाठण्यास सांगितले. निळा शर्ट आणि निळी जीन्स घातलेल्या त्या धावणाऱ्या माणसाच्या डोक्यात कुठलीही निश्चित दिशा नसावी कारण पुढे एका कॉर्नरला वळण घेत तो अगदी पारसी डेअरीजवळ पोचला आणि एका कारने त्याला उडवले.

''XXX'' विक्रांतच्या तोंडून नकळत शिवी बाहेर पडली. धावण्याचा वेग एकदम थांबवून त्याने आधी हातातले पिस्तूल पाठीकडे पँटमध्ये अडकवले.

''सर, मागे पाहा,'' अचानक देव एकदम ओरडला आणि त्याने

विक्रांतला सावध केले. एक मोटारबाईक करकचून ब्रेक मारत घसरली आणि विक्रांतपासून काही अंतरावर पडली. कारने उडवलेल्या आपल्या संभावित आरोपीकडे पुन्हा लक्ष केंद्रित करण्यापूर्वी विक्रांतने त्या बाईकवाल्याकडे पाहत पुन्हा एक सणसणीत शिवी हासडली.

''काय परिस्थिती आहे ह्याची?'' देवने विक्रांतला प्रश्न केला. धडक मारणाऱ्या कारची गती फारशी नव्हती आणि धावणारी व्यक्ती समोर आल्यावर ड्रायव्हरने लगेच ब्रेक लावले होते. तो आणि रस्त्यावरून जाणारी गर्दी आता त्या खाली पडलेल्या जखमी माणसाभोवती गोळा झाले होते. सगळ्यांच्या चेहऱ्यावर भय होते.

''नाडी तर व्यवस्थित आहे, पण मला जास्त काही सांगता येणं शक्य नाही,'' तोंडावर पडलेल्या आरोपीला सरळ करत विक्रांतनी देवच्या प्रश्नाला उत्तर दिले. सपाटून तोंडावर पडल्यामुळे त्या माणसाचे नाक चिरडले गेले होते आणि त्यामुळे तो तोंडाने भसाभसा श्वास घेण्याचा प्रयत्न करत होता. मात्र तो बऱ्यापैकी शुद्धीवर होता.

''ॲम्ब्युलन्स पोचते आहे सर,'' होम बेसने विक्रांतला माहिती पुरवली.

''उत्तम. इथे नक्की काय काय घडलं हे तुम्हाला पाहता आलं का तिथे?'' त्याने चौकशी केली.

''जे काही झालं ते नक्की काय होतं, हे समजून घेण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत, सर.''

''म्हणजे नक्की काय म्हणायचं आहे तुम्हाला,'' पडलेल्या माणसाच्या जखमांचा अंदाज घेत असताना विक्रांतने त्यांना विचारले.

''तुम्ही... तुम्ही जर नजर उचलून आजूबाजूला पाहिलं तर, सर...'' पलीकडून उत्तर आले.

आणि या वेळी पहिल्यांदा विक्रांतने नजर उचलून सभोवार पाहिले.

''साला, हा काय प्रकार आहे...'' त्याच्या तोंडून अभावितपणे शब्द बाहेर पडले.

सर्व आकारांच्या आणि प्रकारांच्या वाहनांनी रस्त्याचा कोपरा न कोपरा व्यापला होता. गाड्यांच्या हॉर्नचे कर्णकर्कश आवाज वातावरणात भरलेले होते. काही चारचाकी वाहनांच्या चालकांनी रस्त्यावर उतरून परिस्थितीचा अंदाज घ्यायला सुरुवात केली होती. आणि शिव्यांची लाखोली वाहिली जात होती.

विक्रांतने आरोपीची मानगूट जमिनीशी लागून सावकाश धरून ठेवली होती आणि आता तो आणि देव पाठीला पाठ लावून त्यांच्या सभोवती घडत असलेल्या गोंधळाचा अंदाज घेऊ लागले, हळूहळू वाढलेल्या या गाड्यांच्या रांगांच्या मागे आता रांगा वाढू लागल्या होत्या.

"हे सगळे कुठून आले च्यायला? आणि ट्रॅफिक सिग्नलला काय झालं?" देवने आश्चर्य व्यक्त केले.

विक्रांतच्याही मनात हेच आले होते. इतक्या मोठ्या प्रमाणात जॅम म्हणजे नक्कीच कुठल्या तरी महत्त्वाच्या ट्रॅफिक सिग्नलला लोचा झाला असणार, हा अंदाज त्यानेही बांधला होता.

"सगळ्या टीम, आपापली स्थिती कळवा," विक्रांतने आदेश सोडला.

"टीम एक, सर आम्ही इथे एका बोळाच्या तोंडाशी अडकलो आहोत. ट्रॅफिक सिग्नलचा काहीतरी वांधा झालाय. तुफान ट्रॅफिक जॅम आहे इथे."

"टीम दोन, सर. आणि टीम तीन पण आमच्याच सोबत आहे. आम्ही ऑफिसला परत निघालो होतो, पण परत या इमारतीत आलोय. संपूर्ण मेट्रो सिनेमा जंक्शनला लोचा झाला आहे सर. अचानक सगळे सिग्नल बंद झाले आहेत आणि हे साले मोटारबाईकवाले संधीचा फायदा घेऊन भरधाव निघायचा प्रयत्न करत आहेत. आमच्या परतीच्या मार्गात किमान सहा अपघात आम्ही पाहिले सर."

विक्रांत आणि देव वळले आणि त्यांनी परस्परांकडे फक्त पाहिले.

"होम बेस," विक्रांतने पुन्हा आदेश द्यायला सुरुवात केली, "लगेच ट्रॅफिक कंट्रोल रूमला संपर्क करा."


क्षणभर तिकडे शांतता पसरली होती आणि मग टीमचे नेतृत्व करणाऱ्या अधिकाऱ्याने उत्तर दिले.

"अख्ख्या शहरात हेच घडत आहे सर," त्याने गंभीर आवाजात उत्तर दिले. "शहरातला एकही ट्रॅफिक सिग्नल काम करत नाहीये. मी पुन्हा सांगतो, मुंबई शहरातला एकही ट्रॅफिक सिग्नल काम करत नाही आहे."

"आणि नेमकं काय झालं आहे याची कुणालाही काहीच कल्पना नाही आहे. पण हे जे काही आहे, त्याने संपूर्ण यंत्रणा ठप्प झाली आहे."

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# लोकशाहीच्या हत्येसाठी

भारताचा जुलूमशाहीकडे प्रवास

**देबाशीष रॉय चौधरी**
**जॉन कीन**

अनुवाद

**उत्पल व. बा.**

*अस्तित्वाच्या दैनंदिन लढायांवर प्रकाशझोत टाकत भारतीय लोकशाहीच्या यशापयशाचा सांगोपांग आलेख मांडणारं प्रभावशाली पुस्तक*

### दूरवरचे इंद्रधनुष्य

एक जुनी म्हण आहे. तिचा आशय असा की, काही गोष्टींचे सगळेच देश गुलाम असतात. कुठल्या गोष्टींचे? तर आपल्या देशाच्या 'उगमा'विषयी काही विशिष्ट कल्पना, आपल्या देशाच्या सुवर्णमयी भूतकाळाविषयीचा आंधळा अभिमान, आपल्या देशाकडून फार काही

साध्य होईल असे इतरांना वाटत नव्हते, तेव्हा आपल्या देशाकडून काही असामान्य गोष्टी साध्य झाल्या, असे म्हटले गेल्यावर होणारा निर्मळ आनंद. काळाच्या कसोटीवर खऱ्या ठरलेल्या या सत्याला भारतही अपवाद नाही. भारताची गोष्ट साधारण अशी आहे - विसाव्या शतकाच्या मध्यावर अनेक संकटांचा सामना करत भारतीय लोक आणि त्यांचे नेते यांनी साम्राज्यवादी वर्चस्वाचे साखळदंड तोडून टाकण्यासाठी लढा दिला आणि ते लोकशाहीच्या खडतर रस्त्यावरून चालू लागले. त्यांनी जी लोकशाही स्थापन केली, ती आज पृथ्वीवरील सर्वांत मोठी लोकशाही आहे. इतकेच नाही, तर या लोकशाहीने लोकशाही मूल्यांना नवसंजीवनी दिली. रक्तरंजित फाळणीतून सावरलेला एक देश म्हणून भारताची आंतरराष्ट्रीय प्रतिमा उजळवली - एक असा देश ज्याने एका बलाढ्य साम्राज्याला पराभूत केले आणि देशातील लोकांनी देशातील लोकांसाठी स्व-शासनाचा दागिना दिमाखात बहाल केला.

इतर देशांच्या गोष्टींप्रमाणेच 'सर्व प्रारंभांचा प्रारंभ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका प्रारंभावरील विश्वासावर भारत उभा आहे. हा प्रारंभ म्हणजे १४ ऑगस्ट १९४७चा सूर्यास्त व्हायच्या आधी भारतीय लोकशाहीचा जन्म होण्याचा जादुई क्षण! या क्षणी पावसाळ्याच्या उत्तरार्धातील दिल्लीच्या आकाशात जुन्या साम्राज्यशाही संसदेवर भारताचा तिरंगा फडकला होता. एका दूरवरच्या इंद्रधनुष्याच्या आशीर्वादासह. त्या दिवशी मध्यरात्रीच्या थोडाच वेळ आधी एखाद्या तरुण मुलासारख्या सडपातळ अंगकाठीचे जवाहरलाल नेहरू गुलाबाचे फूल लावलेला पांढरा कोट परिधान करून संविधान सभेसमोर उभे राहिले होते. ब्रिटिश सत्तेपासून पूर्ण स्वातंत्र्य मिळवण्यासाठी चाललेला ५० वर्षांचा लढा अखेर संपला आहे, हे सांगण्यासाठी. जवाहरलाल नेहरूंचे ते साडेचार मिनिटांचे भाषण आधुनिक काळातील जागतिक नेत्यांनी दिलेल्या भाषणांपैकी सर्वाधिक प्रभावी भाषण समजले जाते.

नेहरूंच्या शब्दांमध्ये नम्रतेबरोबरच महत्त्वाकांक्षा आणि आर्तताही होती. ते औपचारिक इंग्लिशमध्ये उच्चवर्गीय लहेजात बोलत होते. युद्ध, क्रौर्य आणि वर्चस्व यांनी उद्ध्वस्त केलेल्या जगामध्ये एक नवीन सुरुवात करण्याच्या उद्देशाने ते बोलत होते. 'ऑल इंडिया रेडिओ'च्या मायक्रोफोनमध्ये बोलत नेहरू म्हणाले, 'या गंभीर प्रसंगी आपण भारताच्या, इथल्या लोकांच्या

तसेच मानवतेच्या व्यापक उद्दिष्टाच्या सेवेला वाहून घेण्याची शपथ घेत आहोत, हे अगदीच समर्पक आहे. संपूर्ण जग हे आता ‘एक जग’ आहे. शांती आणि स्वातंत्र्य आता वेगळं करता येणार नाही. स्थानिक आपत्तींचे जागतिक परिणाम होऊ लागले आहेत. सत्ता आणि स्वातंत्र्य यांचा वापर जबाबदारीनं व्हावा, यासाठी जगामध्ये लोकशाहीची स्थापना करावीच लागली आणि त्याची सुरुवात भारतातून होते आहे.’ ते पुढे म्हणाले, ‘अनेक वर्षांपूर्वी आम्ही नियतीशी एक करार केला होता. आमची प्रतिज्ञा पूर्ण करण्याची वेळ आता आली आहे. केवळ पूर्णांशानं नव्हे, तर अतिशय ताकदीनं. ही वेळ कुणाचं वाईट चिंतण्याची किंवा इतरांना दोष देण्याची नाही. आपल्याला देशातील मुलांना राहण्यासाठी स्वतंत्र भारताची एक उदात्त वास्तू बांधायची आहे.’

एक शोषित ब्रिटिश वसाहत ते एक स्वाभिमानी, सत्तेतील वाटा घेणारी लोकशाही म्हणून भारताचा जो प्रवास झाला, त्या प्रवासातील अडथळे ‘भारताने नियतीशी केलेल्या करारा’चे रूपक नोंदवते. नेहरू आणि त्यांच्या काँग्रेस पक्षाने अशा एका आशियाई लोकशाहीची कल्पना केली होती, जी केवळ पश्चिमेची प्रतिकृती नसेल. या नवीन लोकशाहीला दोन प्रश्न एकदम सोडवायचे होते. एकीकडे वासाहतिक मालकांनी बाहेरून घातलेल्या बेड्या तोडायच्या होत्या, तर दुसरीकडे अंतर्गत संदर्भात, वैविध्यपूर्ण पार्श्वभूमी असलेल्या, समान प्रतिष्ठेच्या नागरिकांचा एक नवीन देश निर्माण करून वासाहतिक वर्चस्वाची वीण उसवायची होती. लोकशाही ही पाश्चिमात्य जगाची भेट नव्हती आणि भारतीय परिस्थितीला अनुरूपही नव्हती. खरे तर भारत म्हणजे एका महाकाय, बहुरंगी वास्तवातून राष्ट्रीय एकात्मता, प्रगती, धार्मिक सहिष्णुता आणि सामाजिक समता निर्माण करण्याच्या पहिल्या-वहिल्या प्रयोगाची एक प्रयोगशाळा होती. इथल्या समाजव्यवस्थेला वारशाने मिळालेले सत्तासंबंध आनुवंशिक हिंदू जातव्यवस्थेमध्ये, भाषिक उतरंडीमध्ये आणि संचयित संपत्तीमध्ये रुजले होते. सार्वजनिक वाद-चर्चा, बहुपक्षीय स्पर्धा आणि नियमित येणाऱ्या निवडणुका या संवैधानिक हमी मिळालेल्या प्रती-शक्तीमार्फत हे सत्तासंबंध बदलायचे होते.

भारतीय लोकशाहीला विकसित करण्याच्या प्रयत्नांनी लोकांचे जगणे बदलून टाकण्याहून अधिक काही केले आहे, असे म्हटले जाते. भारताने

प्रातिनिधिक लोकशाहीचे स्वरूप मुळातूनच बदलले. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या अनेक दशकांच्या दरम्यान एका नवीन पोस्ट वेस्टमिन्स्टर प्रकाराच्या लोकशाहीचा उदय झाला.

या प्रक्रियेत अनेक पूर्वग्रहांना तिलांजली मिळाली. लोकशाहीच्या पूर्वअटींबाबतची काही राज्यशास्त्रीय गृहीतके मोडीत निघाली. आर्थिक विकास ही एक मूलभूत पूर्वअट आहे, कारण जर एका पुरेशा लोकसंख्येकडे वाहने, रेफ्रिजरेटर आणि वायरलेस यासारख्या गोष्टी असतील, तरच मुक्त आणि न्याय्य निवडणुका शक्य आहेत, असे ही गृहीतके सांगत होती. भारत अकल्पनीय दारिद्र्याच्या ओझ्याखाली दबलेला देश होता. असे असतानाही आर्थिक प्रगती आणि राजकीय लोकशाही यांच्यामध्ये कार्यकारणभावात्मक, कदाचित गणिती नाते असते या अकादमिक आग्रहाला या देशाने खोटे ठरवले. लोकशाही रुजण्याकरता एखादा देश सर्वांत आधी भौतिकदृष्ट्या सक्षम असला पाहिजे, हा साम्राज्यवादी आणि छद्म वैज्ञानिक पूर्वग्रह इथल्या लक्षावधी अशिक्षित आणि गरीब लोकांनी नाकारला. गरिबीशी झुंजत असताना त्यांनी ठरवले की, ते लोकशाही रुजवण्यासाठी नाही, तर लोकशाहीच्या माध्यमातून भौतिकदृष्ट्या सक्षम होतील.

ज्याला 'भारताची गोष्ट' (इंडिया स्टोरी) म्हटले जाते, ती कथा सांगणारे म्हणतात की, हा एक युगप्रवर्तक बदल होता.[१] 'तिसऱ्या जगा'साठी मुगाबे आणि स्ट्रोएसनर यांच्यासारखी हुकूमशाही आणि लष्करी सत्ता आवश्यक नाही, हे भारताच्या लोकशाहीकरण प्रक्रियेने दाखवून दिले. १९४९नंतरचा चीन आणि इतर अनेक उत्तरवासाहतिक देशांमध्ये हे घडू शकले नव्हते. सामाजिक भिन्नतेचा आदर राखून एका अतिशय वैविध्यपूर्ण देशात राजकीय ऐक्य साध्य करता येऊ शकते, हे भारतीय लोकशाहीवाद्यांनी सिद्ध केले. भारतातील कोट्यवधी लोकांचा इतिहास आणि त्यांच्या परंपरा यात कमालीचे वैविध्य होते. पण या सगळ्या लोकांमध्ये एक गोष्ट मात्र सारखी होती. ती म्हणजे हे लोक युरोपियन नव्हते आणि त्यांना युरोपियनांची सत्ता नको होती. कितीही अडचणी असल्या तरी, या कोट्यवधी लोकांना लोकशाही सामावून घेऊ शकते हे भारतीय लोकशाहीवाद्यांनी दाखवून दिले.

◆



# अभिप्राय


## बाजिंद

काही पुस्तकं अशी असतात की, कितीही वेळा वाचली तरीही त्या पुस्तकाचा कंटाळा येत नाही. पुन्हा-पुन्हा वाचावं असं वाटतं आणि त्याची पारायणं होतच राहतात. असंच एक पुस्तक म्हणजे पै.गणेश मानुगडे लिखित ‘बाजिंद.’

‘बाजिंद’ हे एक असं रसायन आहे जे प्रत्येकाला अक्षरशः वेड लावतं. साधारण चार-पाच वर्षांपूर्वी पहिल्यांदा वाचलं होतं, त्यानंतर बऱ्याचवेळा आणि आज पुन्हा एकदा. त्याबद्दलची एक सुंदर आठवण म्हणजे माझ्या बहिणीच्या गरोदरपणाच्या दिवसांत ग्रहण लागलं होतं आणि त्या ग्रहणकाळात तिला मी बाजिंद वाचून दाखवलं होतं, असं हे पुस्तक.

कुस्ती, प्रेमकथा, हेरगिरी, गूढ, रहस्यमय बाजिंदचं जंगल, पशु-पक्षी व हिंस्र जनावरांची भाषा, बहिर्जी नाईक आणि अवघ्या हिंदुस्थानाचे आणि मराठी मनाचे आराध्य दैवत श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज असा या पुस्तकाचा प्रवास. शेवटाला अंगावर काटा आला की, समजावं आपण या पुस्तकाच्या प्रेमात पडलोय.

रायगडच्या डोंगरदरीत वसलेल्या धनगरवाडीचा सखाराम धनगर आणि त्याच्यासोबत मल्हारी, सर्जा आणि नारायण निघालेत छत्रपती शिवरायांना भेटायला; कारण टकमक टोकावरून ज्या गद्दारांचा कडेलोट व्हायचा ती प्रेतं येऊन पडायची ती थेट धनगरवाडीच्या आसपासच्या जंगलात आणि त्यामुळे आसपासच्या परिसरात जंगली




जनावरांचा सुळसुळाट खूप वाढला होता. त्यांची मेजवानी व्हायची; पण जेव्हा कधी कडेलोट नसायचा तेव्हा ती हिंस्र जनावरं आसपासच्या लोकवस्तीत शिरायची. हीच कैफियत मांडायला सखाराम धनगर आणि इतर मंडळी रायगडी निघतात. त्यानंतरचा त्यांचा प्रवास आणि कथा वाचकाला इतकी गुरफटवून टाकते की, शेवटच्या पानावरची शेवटची ओळ कधी वाचून संपते, कळतही नाही. त्यांची स्वराज्य हेर खंडोजाशी भेट मग सावित्री, वस्ताद-काका, वाचतानाही भीतिदायकतेचा अनुभव देणारं जंगल, कधीही न पाहिलेलं महादेवाचं मंदीर, खंडोजीचा असणारा ट्विस्ट आणि मग बहिर्जी नाईक आणि मग थेट रायगड आणि महाराज, सगळं प्रत्यक्षात आपल्यासमोर घडतंय असा भास निर्माण करणारं असं हे पुस्तक.

एखाद्या चित्रपटालाही लाजवेल अशी कथा, एकदा वाचली की पुन्हा एकदा वाचण्याचा मोह आवरता येत नाही अशी कथा, ज्यामध्ये असं बरंच काही आहे, जे वाचल्याशिवाय कळणार नाही. अजून एक असं की सातासमुद्रापार जगातील अव्वल गणली जाणारी इस्राईलची गुप्तहेर संघटना मोसाद यांच्या अभ्यासक्रमात बहिर्जी नाईक आणि आपलं हेरखातं शिकवलं जातं अशी अभिमान वाटणारी घटना आपल्या राज्यात घडलीय त्याचीच ही गोष्ट...बाजिंद...

...इकडे खंडोजीने सावित्रीला उचलून जंगलातून बरंच बाहेर आणलं होतं. पुढे डोंगराची कडेतुट होती आणि हजारो हात खोल फेसाळणाऱ्या नदीचे विशाल पात्र... खंडोजीने एकदा मागे पाहिले आणि ताडले की शिकर्‍यांची फौज पाठलाग करत आहे...त्याने कशाचाही विचार न करता सावित्रीसह स्वत:ला त्या कडेतुटवरून त्या विशाल नदीच्या पात्रात झोकून दिले...आणि...

त्यासाठी वाचा पै.गणेश मानुगडे लिखित... बाजिंद..!!!

**– विश्वजीत श्रीपती शिंत्रे**

मु.पो.इंचनाळ, ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर

९९२२३१३९१९

*सालाबादप्रमाणे यंदाही ऑक्टोबरमध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर भरवल्या जाणाऱ्या आपल्या 'उत्सव पुस्तकांचा' या पुस्तक प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या सर्व पुस्तक विक्रेत्यांची नावे आणि पत्ते खालीलप्रमाणे आहेत.*

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे – ४११०३०
९४२२३२३०३९ / ०२० – २४४६०३१३
sales@mehtapublishinghouse.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
सातारा नगर वाचनालय, राजवाडा, सातारा - ४१५००२
✆ ८६९८७६२६४९
sales@mehtapublishinghouse.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
गोखले हॉल, मोरया गोसावी समाधी मार्ग, चिंचवड गाव, पुणे ४११०३३
✆ ८३२९३८१९९०
sales@mehtapublishinghouse.com

**ज्योती स्टोअर्स**
नाथगंगा टॉवर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२००१
✆ ८७८८६४०८१९
jyotistoresnashik@gmail.com

**उदय एजन्सीज**
३८२८, घुमारे लेन, श्रीपाद ग्रंथ भांडार समोर, शनी चौक, अहमदनगर -४१४००१
✆९९२२६६४९७९
udayagencies03@gmail.com

**साहित्य प्रसार केंद्र**
नेहरू मार्ग, सीताबर्डी, झिरो माइल मेट्रो स्टेशन समोर
नागपूर - ४४००१२
✆९४२२११२७२०
sahityaprasarkendra@rediffmail.com

**साहित्ययात्रा**
अंबरनाथ बुक फेस्टिवल, आगरवाल कम्पाउन्ड, अंबरनाथ (पश्चिम)
बदलापूर
✆ ९६०४५२३८५१
sahityayatra1971@gmail.com

**साहित्ययात्रा**
डोंबिवली बुक फेस्टिवल, डोंबिवली स्टेशन जवळ, मानपाडा, डोंबिवली (प)
✆ ९५९४७७८४३७
sahityayatra1971@gmail.com

**आयडियल पुस्तक त्रिवेणी**
नारायण स्मृती, छबिलदास रोड, दादर (पश्चिम), मुंबई - ४०००२८
✆८५९१०७९०६९
ideal101@rediffmail.com

**प्रशांत बुक हाऊस**
१७, स्टेडिअम शॉपिंग सेंटर
स्टेट बँक ऑफ इंडिया समोर
जळगाव -४२५००१
✆९४२१६३६४६०
prashantbookhouse@gmail.com

**प्रशांत बुक हाऊस**
हेड ऑफिस : ३, प्रताप नगर, संत ज्ञानेश्वर मंदिर रोड
नूतन मराठा कॉलेजच्या मागे. जळगाव
✆९४२१६३६४६०/
८८३०८२४२४१

**विजया वितरण**
मयुरेश एजन्सीज, ८/२१३/२ पाटील हाइट्स, मंगळवार पेठ,
कराड - ४१५११०
✆९४२३२६०६५१
joshitrinetranath237@gmail.com

**रुची बुक पॅलेस**
रसिक साहित्य, बलभीम चौक, टिळक रोड,
बीड -४३११२२
✆९८५०१३४४९०
amolaher333@gmail.com

**श्री महावीर बुक हाऊस**
६७/६९ बाजार गेट स्ट्रीट, फोर्ट,
मुंबई -४००००१
✆७४००११२०८०
shreembh@rediffmail.com

**साहित्य नगरी - शुभम साहित्य**
बळवंत वाचनालय, औरंगपुरा
छ. संभाजी नगर, औरंगाबाद
✆९०९६७३२६५०
kunalombase41@gmail.com

**मनोज पुस्तकालय**
गल्ली नं. ५/६ पारोळा रोड कॉर्नर,
धुळे -४२४००१
✆९४२३४००००० / ८८८८४४४४४१
manojpustakalaya@rediffmail.com

**ग्रंथ द बुक वर्ल्ड**
लेन नंबर ५, राजारामपुरी, मेन रोड जवळ, कोल्हापूर - ४१६००८
✆०२३१-२५३५३५५/
९९२२२९५५२२

**भारतीय पुस्तकालय**
गीतांजली मार्केट, मेन रोड,
लातूर - ४१३५१२
✆९४२१४५३५८४
bharateeyapustakalay@gmail

**शब्दांगण**
नगर वाचनालय, रामेश्वर मंदिराजवळ
वेंगुर्ला, सिंधुदुर्ग - ४१६५१६
✆९०२८८३७९३६

**अभिषेक बुक सेंटर**
मराठा समाज हॉल, डॉ. आंबेडकर रोड, एस टी स्टॅन्डजवळ, सांगली
✆७२९५०८३७२३
akilsk66gmail.com

**अभिषेक बुक सेंटर**
वनिता समाज हॉल, राजकमल चौक,
अमरावती -४४४६०१
✆९८५०८६१६६९
akilsk66gmail.com

**नंदादीप सर्व्हिस**
२३६/१ साखर पेठ, विणकर गार्डन शेजारी, सोलापूर – ४१३००५
✆९८२२८०७७१५/
९३२५०५७६५७
ramakanthboddul@gmail.com

◆

**१६ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०२४ दरम्यानचा दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **विशेष सवलत**

**खालील संचांवर १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान खास सवलत**

**१६ सप्टेंबर - कांचन घाणेकर यांचा जन्मदिन**

'नाथ हा माझा...', 'रेशीमगाठी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ५६५/- । सवलत किंमत ४२९/-**

---

**१६ सप्टेंबर - कमलाबाई ओगले यांचा जन्मदिन**

'रुचिरा भाग-१', 'रुचिरा भाग-२' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६७०/- । सवलत किंमत ४६९/-**

---

**१७ सप्टेंबर-अनंत पै यांचा जन्मदिन**

'आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र', 'आत्मविश्वासाचा कानमंत्र', 'उत्तम स्मृतींचा कानमंत्र', 'यशाचा कानमंत्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ४४५/- । सवलत किंमत ३३७/-**

---

**१८ सप्टेंबर - लान्स आर्मस्ट्राँग यांचा जन्मदिन**

'इट्स नॉट अबाउट द बाइक' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**१९ सप्टेंबर - शरद दळवी यांचा जन्मदिन**

'चित्रमय बोधकथा भाग-१(तीन पुस्तकांचा संच)', 'चित्रमय रंगतदार कथा मालिका भाग-११'(तीन पुस्तकांचा संच) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत २५८/-**

'एकलव्य' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-**

---

**१९ सप्टेंबर - माइल्स टेलर यांचा जन्मदिन**

‘सम्राज्ञी : महाराणी व्हिक्टोरिया आणि भारत’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४८७/-**

---

**२१ सप्टेंबर - स्नेहल जोशी यांचा जन्मदिन**

‘नीलकंठ’, ‘प्लँचेट’, ‘तळं’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ३९९/-**

---

**२१ सप्टेंबर - ख्रिस गेल यांचा जन्मदिन**

‘सिक्स मशिन’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२१ सप्टेंबर - दीपा पोरे यांचा जन्मदिन**

‘ज्ञानदा निबंधमाला’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ११०/- । सवलत किंमत ६९/-**

---

**२३ सप्टेंबर - डी.एस. इटोकर जन्मदिन**

‘A to Z विज्ञान’, ‘छंदातून विज्ञान’, ‘फक्त खेळण्यांसाठी’, ‘खेळणी विज्ञानाची’, ‘खेळणीच खेळणी’, ‘प्रयोग वनस्पती विज्ञानाचे’, ‘साधी यंत्रे’, ‘वाचनातून विज्ञान’, ‘वैज्ञानिक खेळणी’, ‘विज्ञानातील गमतीजमती’, ‘विज्ञानातील रंजकता’, ‘छोट्यांसाठी हवा, पाणी आणि प्रकाशाचे प्रयोग’, ‘छोट्यांसाठी चुंबक, विद्युत आणि ध्वनीचे प्रयोग’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १५७०/- । सवलत किंमत ९४२/-**

---

**२३ सप्टेंबर - रेई किमुरा जन्मदिन**

‘जॅपनीज रोझ’, ‘जॅपनीज ऑर्किड’, ‘जॅपनीज मॅग्नोलिया’, ‘मी एरिक’, ‘आवा मारू-टायटॅनिक ऑफ जपान’, ‘अ नोट फ्रॉम इचियो’, ‘वादळफूल’, ‘मदाम बटरफ्लाय’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १७७०/- । सवलत किंमत ११९९/-**

---

**२६ सप्टेंबर- दिलिप दोंदे यांचा जन्मदिन**

‘सागरी परिक्रमेचा पराक्रम’ या पुस्तकावर विशेष सवलत.

---

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**२९ सप्टेंबर - निर्मला मोने यांचा जन्मदिन**

'चित्रमय रंगतदार कथा, भाग-१३', 'जादूचं रबर आणि इतर गोष्टी, 'पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी', 'पंचतंत्रातील बोधप्रद गोष्टी', 'जंगल जंमत मालिका भाग -२' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७६०/- । सवलत किंमत ६५७/-**

**२९ सप्टेंबर - जागतिक हृदय दिन**

'चला जाणून घेऊ या! हार्ट अ‍ॅटॅक', 'हृदयविकार निवारण', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', 'चला जाणून घेऊ या! शाकाहार', 'चला जाणून घेऊ या! ध्यानसाधना', 'चला जाणून घेऊ या! आहार आणि आरोग्य' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ७०५/-। सवलत किंमत ४२३/-**

**३० सप्टेंबर-एली वायझल यांचा जन्मदिन**

'नाइट' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत ९९/-**

**३० सप्टेंबर - जागतिक अनुवाद दिन**

सर्व अनुवादित पुस्तकांवर ३५ टक्के सवलत.

**(किमान खरेदी १०००रु.)**

**खालील संचांवर १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान खास सवलत**

**१ ऑक्टोबर - उमा कुलकर्णी यांचा जन्मदिन**

'संवादु अनुवादु', 'केतकरवहिनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७४०/- । सवलत किंमत ४४४/-**

**१ ऑक्टोबर - अपर्णा वेलणकर यांचा जन्मदिन**

'फॉर हिअर, ऑर टू गो?' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-**

**१ ऑक्टोबर - डॉ. व्ही. अरविंद यांचा जन्मदिन**

‘दृष्टिदाता’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २५३/-**

**२ ऑक्टोबर - गांधी जयंती**

‘दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी’, ‘महात्मा गांधी आणि तीन माकडे’, ‘मोहनदास’, ‘फ्रिडम अॅट मिडनाइट’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७००/- । सवलत किंमत १०६०/-**

**३ ऑक्टोबर - गुरुचरण दास यांचा जन्मदिन**

‘द डिफिकल्टी ऑफ बीइंग गुड’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४४९/-**

**८ ऑक्टोबर - तहमिमा अनम यांचा जन्मदिन**

‘आहे कट्टर तरी...’, ‘तेच दिन सोनेरी...’, ‘झुबेदा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११८५/- । सवलत किंमत ८४९/-**

**९ ऑक्टोबर - सुधा मेनन यांचा जन्मदिन**

‘आघाडीचे महिला नेतृत्व’, ‘दिव्यगुणी’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५७५/- । सवलत किंमत ३४९/-**

**१० ऑक्टोबर - आर.के. नारायण यांचा जन्मदिन**

‘हलवाई’, ‘वडाच्या झाडाखाली आणि इतर कथा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३४९/-**

**१२ ऑक्टोबर - शान्ता शेळके यांचा जन्मदिन**

‘आंधळी’, ‘आंधळ्याचे डोळे’, ‘अनोळख’, ‘अनुबंध’, ‘चौघीजणी’, ‘गवती समुद्र’, ‘गोंदण’, ‘कविता स्मरणातल्या’, ‘किनारे मनाचे’, ‘लेखक आणि लेखने’, ‘मेघदूत’, ‘निमित्तानिमित्ताने...’, ‘पावसाआधीचा पाऊस’, ‘पूर्वसंध्या’, ‘रंगरेषा’,

'रेशीमरेघा', 'सांगावेसे वाटले म्हणून', 'संस्मरणे', 'सुवर्णमुद्रा', 'वर्षा', 'त्रिवेणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३३०५/- । सवलत किंमत २५२५/-**

---

**१२ ऑक्टोबर-प्रोतिमा बेदी यांचा जन्मदिन**

'टाईमपास' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**१४ ऑक्टोबर - डॉ. अरुण मांडे यांचा जन्मदिन**

'विज्ञान गमती', 'विज्ञान जमती' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४४/-**

---

**१५ ऑक्टोबर - डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती**

'अदम्य जिद्द', 'माझी जीवनयात्रा...', 'टर्निंग पॉइंट्स', 'योद्धा शास्त्रज्ञ राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ६९०/- । सवलत किंमत ४१४/-**

---

**१५ ऑक्टोबर - मारिओ पुझो यांचा जन्मदिन**

'ओमेर्ता', 'द लास्ट डॉन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत ८४५/- । सवलत किंमत ४४९/-**

◆

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**

**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा !**

**या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com**


# नवीन प्रकाशित पुस्तके


## द हिडन हिंदू


'द हिडन हिंदू' भाग १
या पुस्तकाची
अल्पावधीतच
दुसरी आवृत्ती प्रकाशित


### द हिडन हिंदू
### भाग २








**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/09/2024 Posting Date : 11/09/2024

## आवर्जून वाचावे...

**व्यंकटेश माडगूळकर लिखित 'बनगरवाडी' या कादंबरीची 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची सुधारित आवृत्ती लवकरच वाचकांच्या भेटीस...**






**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति,
____________________